
# लांडगा आला रे आला!

मधुसूदन गोखले

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
सं. क्र. २००४
सन १९६४



REFBK-0014842
REFBK-0014842

८१।८२१
७४८६२३
९८।३।८०

2008

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम ८१।८२१
अनुक्रम ७४८६२३ दि: ९८।३।८०
क्रमांक २००४ नों. दि:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना

# लांडगा आला रे आला !



दा. क्र. 14842

# लांडगा आला रे आला !

(विनोदी कवितांचा संग्रह)

मधुसूदन गोखले

श्री लेखन वाचन भांडार,
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणें २

REFBK-0014842
REFBK-0014842

…त तीन रुपये

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ
ठोकळ प्रकाशन
ठोकळ भवन
लक्ष्मी रस्ता, पुणें २

पहिली आवृत्ति : सप्टेंबर १९६५

© सौ. विभावरी गोखले
श्री मौनी विद्यापीठ
गारगोटी (कोल्हापूर)

एकमेव विक्रेते :
श्री लेखन वाचन भांडार
ठोकळ भवन
लक्ष्मी रस्ता, पुणें २

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
टिळक रस्ता, पुणें २

**प्रिय विभास—**

तुझ्या
रागा-लोभाची
पर्वा न करतां
जें कांहीं लिहिलें
तें सारें
**तुलाच !**

कवितांची पूर्वप्रसिद्धी :

दीपावली, माणूस, दीपलक्ष्मी, वाङ्मयशोभा, मनोहर, वीणा, सुदर्शन, महाराष्ट्र टाईम्स, मायबोली, श्यामसुंदर, अलीबाबा, धनुर्धारी, अलमगीर, राजश्री, वसंत, मांडवी.

# अ नु क्र म


१. लांडगा आला रे आला ! १
२. माकडिणीचें स्वप्न ३
३. पंधरा वर्षांनंतर ५
४. जुनी आठवण बोलते आहे ९
५. आपलीच स्टोरी ' बेस्ट ' आहे ! १२
६. माझा सासुरवास १३
७. माझें एक प्रेमपत्र ( जुनें ) १७
८. स्टेशनवरची ' मे आय हेल्प यू ? ' २१
९. बायकोची मैत्रीण २३
१०. आमची बायको अभ्यास करते २५
११. आमची बायको डाएट करते २८
१२. एक नाटक बसतें आहे ३२
१३. आमची बायको गाणें शिकते ३६
१४. आमची बायको शिवण शिकते ४१
१५. आमची बायको नोकरी करते ४४
१६. आमची बायको प्रवास करते ४७
१७. आमची बायको सायकल शिकते ५१
१८. आमची बायको वैताग करते ५५
१९. आमची बायको दौरा करते ५९
२०. स्पर्धांसाठीं पूर्वतयारी ६३

२१. माझी उ(व)दार नायिका ६७
२२. तूं आज नाहींस ७३
२३. तूं उद्यां येणार ७५
२४. आमचे मिस्टर कविता करतात ७७
२५. आमचे मिस्टर दाढी करतात ८०
२६. जळ्ळं मेलं यांचं प्लॅनिंग ! ८४
२७. मधली सुट्टी ८७
२८. आज पाहून हंसत नाहींस ! ८९
२९. तुला पाहतां पतीसंगतीं ९२
३०. बस-स्टॉप ९४
३१. आठ लाखांपैकीं एक ९६
३२. पुणेरी कौतुक ९९
३३. अरे भाई, लाईन लगाव १०२
३४. एक तरी घ्या ठेउन कविता १०६
३५. मला एक कविता झाली १०८
३६. माझें दैवच खोटें आहे ११२
३७. अहो, मला कवी म्हणा ११६
३८. संमेलनाची वर्दी ११९
३९. प्रेमपत्र १२१
४०. एक इसम बारा आणे ! १२४

## लांडगा आला रे आला !

लग्न होऊन मला आतां
तीन वर्षें झालीं आहेत
आमच्याकडे संशयानें
लोक पाहूं लागले आहेत...
    'जळजळ', 'मळमळ', 'कसेसें' चा
    आमच्या घरीं पत्ताच नाहीं
    'तशी' कांहीं नवी हालचाल
    अजून आमच्या घरीं नाहीं...
उठाठेव करणाऱ्यांना
एवढा विषय पुरतो आहे
मी धीर धरला तरी
'ही'चा धीर सुटतो आहे...
    घरच्या प्रत्येक पत्रामध्यें
    एक तरी प्रश्न असतोच
    सूनबाईच्या प्रकृतीची
    जो तो विचारपूस करतो...
'आलबेल्', 'छाऽन आहे'
नेहमीं उत्तर लिहितों आहे
प्रत्येक पत्र वाचत असतां
'ही'चा चेहरा पडतो आहे...
    कॅलेंडरचा प्रत्येक महिना
    नवी आशा दाखवत येतो
    ऐन वेळीं दगा देऊन
    प्रत्येक महिना निघून जातो...

कधीं कधीं 'ही'च्या मनांत
नवीन आशा फुलूं लागते
आणि 'ही'च्या चेहऱ्यावरून
मला त्याची बातमी लागते...

मग आमच्या घरांत एक
नवें स्वप्न रंगूं लागतें
पण साकार होण्यापूर्वीच
आमचें स्वप्न वाहून जातें...

'लांडगा आला रे आला'ची
अधून मधून हूल उठते
मला जरी खात्री नसते
तरी 'ही'ला भूल पडते...

शेवटीं लांडगा येतच नाहीं
गोड भीति खोटी ठरते
इसापाची गोष्ट मात्र
अर्ध्यावरच येऊन तटते ..

गोष्ट पुरी होण्यासाठीं
सारे आतुर झाले आहेत
लांडगोबाची वाट सारे
आतुरतेनें पहात आहेत...

लग्न होऊन तीन वर्षें
आतां होऊन गेलीं आहेत
आमच्याकडे संशयानें
लोक पाहूं लागले आहेत !

# माकडिणीचें स्वप्न

एकदां एका माकडानें
घर बांधायचें ठरवले
मात्र तें कसें हवें
हे बायकोला विचारलें
    माकडिणीला आनंद झाला
    घरोघरीं ती फिरली
    विचार करून आपली मागणी
    माकडासमोर तिनें मांडली
" घर असें बांधा कीं
पूर्वेकडे तोंड हवें,
पश्चिमेचा वारा यावा
गर्दीपासून दूर हवें
    मुलांसाठीं अभ्यासाची
    एक स्वतंत्र खोली हवी
    आल्या गेल्या पाहुण्यांसाठीं
    निराळीच रूम हवी
बाहेरच्या दिवाणखान्यांत
छान सोफा-सेट हवा
मर्फी किंवा सीमेन्सचा
एक सुंदर रेडियो ठेवा
    बेडरूममध्यें डबल पलंग,
    त्याला मच्छरदाणी हवी
    विसरूं नका त्या खोलींत
    चावी आणि मोरी हवी ! !

स्वयंपाकघरांत बर्शेन
बाथरूममध्यें गीझर हवा
माझ्या खोलींत शिवणमशीन
तुमच्या खोलींत इस्त्री ठेवा

बाकी किरकोळ सामानाचें
तुमचें तुम्ही काय तें ठरवा
कमीत कमी सांगितलेलें
हें एवढें लक्षांत ठेवा. ”

माकडिणीनें मागणी मांडली
माकड मोठ्या चिंतेंत पडलें,
सारें कसें जमायचें
याचा विचार करू लागलें

असलें घर थाटण्यासाठीं
‘ क्लास वन् ’ची नोकरी हवी.
शिवाय थोडाफार पैसा
खाण्याचीही संधी हवी.

तसली नोकरी मिळवण्याचा
तो प्रयत्न करूं लागला
मिनिस्टरांच्या बायकांमागें
वशिल्यासाठीं फिरूं लागला

पण बिचाऱ्या माकडाला
नोकरी अजून मिळाली नाहीं
माकडिणीचें स्वप्न कांहीं
अजून खरें झालें नाहीं !

## पंधरा वर्षांनंतर

गेलीं पंधरा वर्षें कांहीं
तुझें दर्शन घडलें नव्हतें
आज अशी रस्त्यांत दिसशील
स्वप्नांत देखील वाटलें नव्हतें
    अशी चमकून पाहूं नकोस
    माझ्यांत कांहींच फरक नाहीं
    तुझ्यांत मात्र पूर्वींच्यांतील
    कांहींसुद्धां शिल्लक नाहीं
लग्न, संसार, पोरेंबाळें
सारी खुषी दिसते आहे
मी मात्र तुझ्या नांवें
लग्नाविना राहिलों आहे
    कॉलेजमधले दिवस आठव
    पोर्चमध्यें बोलत असूं
    कॅन्टीनमध्यें चहा पीत
    कित्ती वेळ बसत असूं !
तुझ्यापाशीं बोलण्यासाठीं
प्रत्येकाचा प्रयत्न असे
आणि मला प्रत्येकजण
पाण्यामध्यें पहात असे
    तुला सारे 'कॉलेजक्वीन'
    म्हणून मान देत असत
    आणि माझ्या भाग्याचा
    सारे हेवा करत असत

तुझ्यासाठीं अभ्यासाच्या
किती नोट्स् काढीत होतों !
मुद्दाम टाईप करून घेऊन
तुला भेट देत होतों

परीक्षेच्या वेळीं तर
आपले नंबर जवळ होते
निरीक्षकांचे डोळे चुकवून
तुझेच पेपर लिहिले होते

तुला 'क्लास' मिळणार म्हणून
मला आनंद झाला होता
मी नापास होणार म्हणून
तुला विषाद वाटत होता

निरोपाच्या आदल्या रात्रीं
आपण पिक्चर पाहिलें होतें
बॉक्समध्यें कोचावरतीं
एक ' स्वप्न ' रंगलें होतें

दुसऱ्या दिवशीं स्टेशनवर
मीच प्रथम आलों होतों
अगदीं गाडी सुटेपर्यंत
आपण बोलत राहिलों होतों

" मीच तुला पत्र लिहितें
मला मात्र लिहूं नकोस
बाबा मोठ्ठे रागीट आहेत ! "
मला सांगून ठेवलं होतंस

" पुढल्या वर्षीं इथेंच येतें "
प्रॉमीस मला दिलं होतंस

" जातां क्षणीं पत्र टाकीन "
म्हणून वचन दिलं होतंस
आणि तुझ्या त्या पत्राची मी
अजून वाट पाहतों आहे
पंधरा वर्षं होऊन गेलीं
तुलाच आज पाहतों आहे

तुझं चवळीसारखं शरीर
कुठं गेलं कळत नाहीं
तेव्हांची ती तूच, असें
सांगून देखील पटणार नाहीं
तुझा आकार एवढा मोठ्ठा
ऐसपैस झाला कसा ?
आज मला प्रथम कळलं
राईचा पर्वत होतो कसा ?

तुझ्या अंवतीं भंवतीं फौज
बहुतेक सारी तुझीच दिसते
त्यांत आणखी भर पडणार
हेंही लक्षण स्पष्ट दिसतें
त्या साऱ्यांच्या वडलांकडे
पाहण्याचें मी टाळतों आहे
आपलं असं झालं नाहीं
म्हणून निःश्वास टाकतों आहे

आत्तां वाटतं, बरं झालं
तुझं पत्र आलं नाहीं
किंवा तुझी माझी भेट
पुढें लवकर झाली नाहीं.

तुला अशी पाहत असतां
सारी आठवण होते आहे
आणि माझ्या मूर्खपणाचें
मलाच हांसू येतें आहे
माझ्या दिलाचे हजार तुकडे
तेव्हां जरी केले होतेस
आज वाटतें माझ्यावरतीं
उपकारच ते केले होतेस
पंधरा वर्षें लग्नावांचून
तुझ्या नांवें राहिलों आहे
तुला पाहून तोच निश्चय
आतां कायम करतों आहे !

# जुनी आठवण बोलते आहे

रस्त्यामध्यें आमच्याजवळ
एक मोटार खेटली आहे
खिडकीबाहेर डोकें काढून
' जुनी आठवण ' बोलते आहे—
" अय्या ! कित्ती दिवसांनंतर
आज पडते आहे गांठ !
लग्नामध्यें कित्ती कित्ती
तुझीच पहात होते वाट... !
नुसत्या पत्रीकेवर तूं
नक्कीच येणार नाहींस म्हणून
पत्र देखील कित्ती छान
टाकलं होतं आवर्जून... !
पूर्वींसारखंच पत्र समजून
तूं तें जपून ठेवलं असशील
मखमलीच्या पेटीमध्यें
ठेवून विसरून गेला असशील...
तार देखील केली नाहींस
इतका शिष्ठ झालास ना ?
कॉलेजांतली सारी ओळख
तूंही विसरून गेलास ना ?...
इश्श ! आणिक हें रे काय ?
लग्न देखील केलंस वाटतं !
ही कोण तुझी बायकोच ना ?
गुपचुप लग्न केलंस वाटतं !...

ओळख तरी दे करून
मघांपासून पाहते आहे
एकही शब्द बोलत नाहींस
तुला काय झालं आहे ?...

अरे, खरंच विसरलेच
ड्रायव्हर नव्हे ! माझेच मिस्टर ! !
आपल्या कॉलेजांतच होते
सायन्सकडे डेमॉन्स्ट्रेटर...

यांना ड्रायव्हिंग करतांना
पाहून तूंही फसलास ना ?
जेथें जातें तेथें तेथें
असंच वाटतं सर्वांना...

सध्यां आमच्याच ऑफिसांत
केमिस्ट म्हणून काम करतात
आमची ओळख तेथेंच झाली
ड्रायव्हिंग देखील छान करतात...

आणिक ' बरं का हो ' हा
माझा मित्र कॉलेजांतला
याच्या-माझ्याबद्दलच
खूप होता बोल-बाला...

कांहींच कां रे, बोलत नाहींस ?
मीच सारखी बडबडतेय्
आणिक तुझी बायको बघ
मलाच कशी न्याहाळतेय् !...

तुला सांगायचंच राहिलं
तुझी ' शालन ' भेटली होती

अरे, माझ्या लग्नासाठीं
नवऱ्यासकट आली होती...
 ‘ शैला राजे ’, ‘ वसू प्रधान ’
 वर्षापूर्वी भेटल्या होत्या
 तुला अजून नोकरी नाहीं
 म्हणून ‘ चक् चक् ’ करीत होत्या...
तुला नोकरी केव्हां लागली ?
लग्न तरी केव्हां झालं ?
सगळं सगळं सांगण्याकरतां
पाहिजे माझ्या घरीं आलं !...
 अय्या ! यांना झालं काय ?
 यांनीं मोटार स्टार्टच केली
 विसरूं नकोस, घरीं ये
 बरं झालं भेट झाली ! ”
एक मोटार आमच्या जवळून
आत्तांच निघून गेली आहे
माझी बायको माझ्याकडे
आश्चर्यानें बघते आहे ! !

# आपलीच ‘स्टोरी’ ‘बेस्ट’ आहे !

रोमिओ अन् ज्यूलिएटची
मला आठवण देऊं नकोस
लैला-मजनू , शिरीं-फरहाद
यांच्या कथा सांगू नकोस

ढोला—मारू, हीर-रांझा
यांचें स्मरण देऊं नकोस,
सोनी-महिवाल, मिर्झा-साहिबा
यांचें कौतुक करूं नकोस

बाजबहादूर-रूपमतीला
स्मरण्याची ही वेळ नव्हे,
बाजिराव अन् मस्तानीला
आठवण्याचा काळ नव्हे

कारण तुझं-माझं प्रेम
त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहे,
त्या साऱ्यांच्या कथांपेक्षां
आपलीच ‘ स्टोरी ’ ‘ बेस्ट ’ आहे

ताटातूट झाली तरी
ठणठणीत जिवंत आहोंत
प्रेमभंग होऊनदेखील
हसतों आहोंत, मजेंत आहोंत !

## माझा सासुरवास

उद्यांपासून आमच्या घरीं
ढुंकूं नका, फिरकूं नका,
दोन महिने माझ्यावरतीं
प्रसंग येणार आहे बांका !
 ' ही 'चे मम्मी आणि पप्पा
 उद्यां इथें येणार आहेत
 कमींत् कमी दोन महिने
 इथेंच मुक्काम ठोकणार आहेत !
मेहुणा आणि मेहुणी देखील
त्यांच्या बरोबरच येतील
बायकोसकट पांचजणं
या घराचा ताबा घेतील !
 उद्यांपासून आमचं घर
 ' ही 'चें माहेर बनणार आहे
 आणि माझा सासुरवास
 इथेंच सुरू होणार आहे !
' ही 'चे पप्पा ( माझे श्वशूर ! )
मुद्दाम इथें येणार आहेत
चांगली दोन महिने म्हणे,
' रेस्ट ' इथें घेणार आहेत !
 माझी अभ्यासिका आतां
 त्यांची ' रेस्टरूम ' होईल
 तशीच आमची बेडरूम
 आतां मला बंद होईल !

कारण, डब्बल पलंगाचा
सासूबाई ताबा घेतील
रोज रात्रीं गप्पांसाठीं
' ही 'ला जवळ झोपवून घेतील !

इतकी मोठ्ठी झाली तरी
' ही 'ला आई सोडवत नाहीं
आई इथें असली म्हणजे
माझी आठवण होतच नाहीं !

तेव्हां उद्यांपासून माझी
गादी जाईल गच्चीवर
' तिथें वारं छानच असतं '
पटवलं जाईल वरचेवर !

धाकटा मेहुणा ( वय बारा )
सुट्टींत सायकल शिकणार आहे
दोन महिने माझी सायकल
त्याच्याच हातीं राहणार आहे !

धाकटी मेहुणी ( वय अठरा )
धाकटी कसली, मोठ्ठीच आहे ! !
दरवर्षीं एस्. एस्. सी. च्या
दोन्ही वाऱ्या करते आहे !

मेव्हणाबाई येतांक्षणीं
रेडिओचा ताबा घेतील
गोवा–सिलोन–विविध भारती
तासन् तास लावत बसतील !

वय ऐकून चमकूं नका
तसं तिच्यांत कांहींच नाहीं
" बायकोपेक्षां मेहुणी बरी ! "
म्हणणं कांहीं खरं नाहीं !

उद्यांपासून रोज मला
मंडईंत जावं लागेल
" यांना व्यवहार कळतच नाहीं "
रोज ऐकून घ्यावं लागेल !

माझी नोकरी, माझा पगार
रोज एकदां उद्धार होईल
दुसऱ्या दोन जावयांचें
हज्जार वेळां कौतुक होईल

रोज रात्रीं घरांत आतां
' गध्धे–कोट ' रंगणार आहे
रोज रात्रीं झब्बूमध्यें
मीच गाढव ठरणार आहे !

वाण्याकडच्या बिलांमुळें
डोळे पांढरे होणार आहेत
' पाहुणचार झालाच नाहीं '
वरतीं बोल येणार आहेत !

उद्यांपासून दोन महिने
कसे जातील, असं होईल
शेवटीं एकदां घर धुऊन
ही यात्रा निघून जाईल !

जातां जातां आग्रहानें
‘ ही ’ला मात्र घेऊन जातील
फर्स्ट क्लासचीं पांच तिकिटें
मलाच काढून द्यावीं लागतील !

सारी जत्रा गेल्यावरतीं
मग निवांत घरीं या
साखर उरली असेल तर
सिंगल चहा पिऊन जा !

## माझें एक प्रेमपत्र ( जुनें )

फार फार वर्षांपूर्वीं
कधीं तरी लिहिलेलें
माझें एक प्रेमपत्र
' ही 'ला आहे सांपडलें

त्याचाच जाब-जबाब आज
घरामध्यें चालू आहे
आरोपीच्या पिंजऱ्यामध्यें
सकाळपासून उभा आहें

एक तपाच्या संसाराला
आज आग लागली आहे
माझें एक प्रेमपत्र
हिच्या हातीं लागलें आहे

माळ्यावरच्या रद्दीमध्यें
पत्र हिला सांपडलें
आणि तें पाहतां क्षणीं
हिचें डोकें भडकलें

माळ्यावरतीं असलें कांहीं
असेल असें वाटत नव्हतें
नाहीं तर ' रद्दी काढ '
असें हिला म्हटलेंच नसतें

पत्रामध्यें काय आहे
कांहींच अंदाज लागत नाहीं

माझ्या हातीं माझेंच पत्र
मागून देखील मिळत नाहीं

हिच्या हातामध्यें मला
एक जुनें पुस्तक दिसतें
बहुतेक त्याच्याच पानांमधून
पत्र सांपडलेलें दिसतें

पुस्तकाच्या पुठ्ठ्यावरून
शेक्सपिअरचें नाटक दिसतें
म्हणजे माझें इंटरमधलें
गुपित बाहेर पडलें वाटतें

खरें म्हणजें गुपित असें
त्यांत फारसें कांहींच नव्हतें
कारण माझें पहिलें प्रेम
'ओन्ली फिफ्टी पर्सेंट' होतें

'ती'चें नांव आज हिला
सांगून कांहीं उपयोग नाहीं
तिच्या नांवें ओरडण्याचें
हिला कांहींच कारण नाहीं

वीस वर्षें होऊन गेलीं
'अष्टपुत्रा' झाली असेल
आणि माझें नांव देखील
केव्हांच विसरून गेली असेल

आमचें 'हंसणें', 'बोलणें', 'फिरणें'
असें कधींच झालें नव्हतें

तिला पाहून उगाच आपलें
मनांत कांहीं वाटत होतें

तेंच एकदां पत्रामध्यें
मी लिहून काढलें होतें
पण तें तिला द्यायचें
माझ्यामध्यें धाडस नव्हतें

एक दिवस अचानकच
तिचें लग्न होऊन गेलें
माझें फिफ्टी पर्सेंट प्रेम
सेंट पर्सेंट वाहून गेलें

माझें पहिलें प्रेम असें
मुळामध्येंच खुडलें गेलें
आणि माझें प्रेमपत्र
कुठें तरी गहाळ झालें

तेंच माझें गहाळ–पत्र
असें प्रगट झालें आहे
आज हिच्या हातामध्यें
माझें गुपीत बोलतें आहे

आतां सारें खरें सांगून
हिला कांहीं पटणार नाहीं
आणि हिच्या प्रश्नांमधून
माझी सुटका होणार नाहीं

' कोण कुठली सटवी होती ? '
' घर तरी कुठें आहे ? '

‘ मजल कुठवर गेली होती ? ’
प्रश्न-फैर झडते आहे

हिच्या असल्या अवतारानें
सारा वाडा जमला आहे
प्रत्येकजण माझ्याकडे
संशयानें पाहतो आहे

माझ्या जुन्या पत्रामुळें
घरांत आग लागली आहे
आणि जन्मभर आतां ती
तशीच धुमसत राहणार आहे !

## स्टेशनवरची ' मे आय हेल्प यू ? '

स्टेशनवरची ' मे आय हेल्प यू ? '
आज कुठें गेली आहे ?
पाटीखालची टेबलखुर्ची
मोकळी मोकळी वाटते आहे
    रोज ठरल्या गाडीनें मी
    नियमितपणें येतों जातों
    प्रत्येक वेळीं मदतीसाठीं
    तिच्या जवळ हटकून जातों
' गाडी किती लेट आहे ? '
' फास्ट किंवा स्लो आहे ? '
असले प्रश्न विचारायची
प्रत्येक संधी घेतों आहे
    ' सेकंड क्लास कोठें येईल ? '
    ' नक्की किती वाजले आहेत ? '
    असले माझे प्रश्न तिला
    आतां पाठ झाले आहेत
असलें कांहीं विचारण्याची
आज संधी मिळणार नाहीं
कारण आज ' मे आय हेल्प यू '
पाटीखालतीं दिसत नाहीं
    गर्दी असून स्टेशन मला
    सुनें सुनें वाटतें आहे
    मनामध्यें मात्र माझ्या
    कुशंकांची गर्दी आहे

1482

आणखी कुणी तरी तर
मदत मागत आला नसेल ?
त्याला मदत करतांना ही
हरवून तर बसली नसेल ?
किंवा कोणीं हॉटेलाचा
पत्ता पुसत आला असेल
त्याच्याच बरोबर हॉटेलांत
गप्पा तर मारत नसेल ?
किंवा कोणी अडचणीचें
खोटें नाटक केलें असेल
आणिक ' मदत पाहिजे काय '
अडचणींत तर पडली नसेल ?
शंका संपतां संपत नाहींत
काय असेल, कळत नाहीं
ठरली गाडी चुकली याचें
मला भान राहत नाहीं
' मे आय हेल्प यू ? ' पाटीवरचें
भलें मोठ्ठें प्रश्नार्थक
आज माझ्या डोळ्यांसमोर
नाचतें आहे निरर्थक
दुसरें तरी कोणी मला
आज मदत करील का ?
' मे आय हेल्प यू ? ' कोठें गेली
मला कोणी सांगेल का ?

# बायकोची मैत्रीण

माझ्या बायकोची मैत्रीण
आज घरीं येणार आहे!
आज तिची माझी ओळख
'ही 'च करून देणार आहे!

"नाक अपरं असलं तरी
उडवतांना दिसते छान!
गालावरती तीळ आहे
रूप कसं गोरंपान!

बोलण्यामधें ठसका आहे
जरा ठेवते कलती मान-"
असं आणखी कित्ती तिचं
वर्णन सारखं चालू आहे

तें सारं ऐकतां ऐकतां
मी गालांत हंसतों आहें!...
मी गालीं हंसतों आहें
'ही' मात्र चिडते आहे

'खरं कीं खोटं बघाच अत्तां'
म्हणून पैज मारते आहे
अशी कौतुकाची मैत्रीण
आज घरीं येणार आहे,

'ती' मला दाखवण्याला
हीच फार अधीर आहे!...

मी कुठें उभे राह्यचे,
कधीं, कसें हांसायाचे,
नाजुक साजुक बोलायाचे
धडे मला मिळत आहेत,
मॅनर्स आणि एटिकेटस्
यांचा मारा ऐकतों आहें...

मला हंसणं आवरत नाहीं
उघड हंसून चालत नाहीं
कारण तिच्या मैत्रिणीशीं
माझी ओळख जुनीच आहे

तिचं बोलणं-हंसणं-वागणं
सारं मला माहित आहे
तिची ' तीळ न् तीळ ' माहिती
मला अचूक ठाऊक आहे !

बरं झालं, हिला यांतलं
कांहीं एक ठाऊक नाहीं
आणि हिच्या मैत्रिणीला
इथलं कांहीं माहित नाहीं

' ही 'ची मैत्रिण म्हणून आज
तीच घरीं येते आहे !
आणि तिची–माझी ओळख
' ही 'च करून देणार आहे

काय पुढं होईल त्याची
देवालाच काळजी आहे !

## आमची बायको अभ्यास करते

आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करते का ?
    गायडन्स पाहिजे पर्सनल्
    कारण बसतेय् एक्स्टर्नल्
आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करते का ?
    अवतालचे भंवतालचे
    शहाणे आणि शिकलेले
    सारे घाबरून गेले आहेत,
    त्यांच्याकडे जाऊन जाऊन
    माझे जोडे झिजले आहेत
    रोज माझें डोकें खाते
    तुमचें डोकें खाते का ?
आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करते का ?
    रोज नवें पुस्तक पाहते
    ( जाहिरातवाले डँबिस् साले ! )
    पत्रांवर पत्रें लिहिते
    रोज एक व्ही. पी. येते
    ( पोस्ट मोठें आहे प्रॉम्प्ट ! ! )
    खिसा पार रिकामा करते
    असा अभ्यास चालू आहे
    माझा जीव जातो आहे
आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करते का ?



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 78723 दि: ........
क्रमांक 2008 नों दि: 98/3/07

कृपा करून आमच्या घरीं
चुकूनही फिरकूं नका
आमच्या घरची आजकाल
झाली आहे खानावळ
घरामधील चहापाणी
आवरसावर खाणींपिणीं
सारीं आतां मीच करतों
न करून कुठें जातों ?
आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करते का ?

ताटावरून पाटावर
पाटावरून टेबलावर
पुस्तकाखेरीज दुसरें कांहीं
हिला मुळींच सुचत नाहीं
नवरा आणि पोरें यांची
शुद्ध हिला अगदीं नाहीं,
हसूं नका तोंडभर
पाळी येईल तुमच्यावर
आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करणार आहे
( हीच परवां म्हणत होती
हिची बत्तिशी वाईट आहे ! )
'रात्र' या शब्दाला
माझ्या कोशांत अर्थच नाहीं
जेव्हां पाहतों तेव्हां तेव्हां
ही असते टेबलापाशीं

खरें म्हणजे पुस्तकांत
डोकें ठेवून घेते झोप
मात्र तसें म्हटलें तर
माझ्यावरच डाफरते
आमची बायको अस्सं करते
तुमची बायको करते का ?

हिची एक तक्रार मी
रोज रोज ऐकतों आहें
" आम्ही इतकं मरतों तरी
त्याचं यांना कांहींच नाहीं
आम्ही मेलं शिकलों तर
यांचं नाक ठेचेल ना ! "
अस्सं आमची बायको म्हणते
तुमची बायको म्हणते का ?
आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करते का ?

दोन वर्षें झालीं आतां
असंच हें चालू आहे
नोकरी सोडून बसण्याची
माझ्यावर पाळी आहे
हिचा अभ्यास चालेतों
माझें जागरण चालू आहे
हिची परीक्षा होईतों
माझी शिक्षा चालू आहे
आमची बायको अभ्यास करते
तुमची बायको करते का ?

# आमची बायको डाएट करते

आमची बायको डाएट करते
माझेंच वजन घटतें आहे
हिचा घेर आणि माझी उंची
दिवसेंदिवस वाढतेच आहे...
बारीक होण्यावरची सारी
ट्रीटमेंट सध्यां चालू आहे
जगामधलें प्रत्येक औषध
आज घरांत हजर आहे
लिमिकल् नि मॅट्रिकल्
केव्हांच पचून जिरलें आहे
कॅलरीजची उष्णताही
केव्हांच थंड झाली आहे
आमची बायको डाएट करते
घर दवाखाना झाला आहे
व्यायामाचे विविध हात
आसनांचे अनेक प्रकार
पळणें आणि उड्या यांचें
रोज तांडव चालू आहे
वजन-कांटा चढून चढून
पार मोडून गेला आहे
बेल्जीयमचा मोठा आरसा
पाहून पाहून विटला आहे
आमची बायको डाएट करते
जमीन मात्र हादरते आहे

कधीं नुसतें पाणी पिते
कधीं लिंबू-पाणी घेते,
कधीं नुसती ब्रेडच खाते
कालचें आज खरें नाहीं,
स्वयंपाकांतून तेल-मीठ
झालें आहे हद्‌पार
दूध, तूप, लोणी हेंही
केलें आहे तडी-पार
आमची बायको डाएट करते
माझेंच तेज घटतें आहे

साखर मुळींच चालत नाहीं
मीठ असून भागत नाहीं
भाताचें केवळ दर्शन तर
झालें आहे अपथ्यकर
भाकरी कशी-बशी चालते
तूप त्यावर मुळींच नको
आमटीवरचें कळण चालेल
डाळ मात्र मुळींच नको
आमची बायको डाएट करते
माझेंच वजन घटतें आहे

रोज हिचा नवा प्रयोग
माझा बळी जातो आहे
हिच्यामुळें रोज नवा
अनुभव मात्र मिळतो आहे
काय चालतें, काय नाहीं
आमच्याकडे येऊन पहा

एक्सपर्ट गायडन्स हवा तर
मला कन्सल्ट करून जा
आमची बायको डाएट करते
मीच एक्सपर्ट बनतो आहें
वय आणि वजन यांचें
प्रमाण मला ठाऊक आहे
उंची आणि घेर यांचें
कोष्टक पाठ झालें आहे
तोळे, मासे, गुंजा आणि
ग्रॅम, किलो, हन्ड्रेडवेट
यांची माहिती आजकाल
मला पाठ येते आहे
आमची बायको डाएट करते
माझें गणित घटतें आहे
आजकाल माझी भाषा
फारच कर्डी झाली आहे
नव्या नव्या शब्दांची
भर रोज पडते आहे
फॅटस आणि कॅलरीज
यांचा अर्थ मीच जाणतों
कार्बोहायड्रेटसारखा शब्द
स्पेलिंगसकट पाठ म्हणतों
आमची बायको डाएट करते
माझें ज्ञान वाढतें आहे
रोज ‘ ही ’ एकदां तरी
लाडांत येऊन विचारतेंच

“ खरंच ना हो कालच्यापेक्षां
आज मी बारीक दिसते ?
पोलकीं सैल झालीं बघा
पांचवारी आतां पुरतें
बांगड्यांचाही बीड आतां
बदलूनच घ्यावा म्हणते ”
आमची बायको डाएट करते
मी मात्र पेंचांत आहे
‘ होय ’ म्हणणें खरें नाहीं
‘ नाहीं ’ म्हणून भागत नाहीं
दुर्लक्ष करूनदेखील यांतून
सुटका कांहीं होत नाहीं
खरंच तसं कांहींच नसतां
‘ हो ’कार मात्र घेउन जाते
सर्वांकडे जाऊन जाऊन
त्याचेंच कौतुक करीत बसते
आमची बायको डाएट करते
माझेंच वजन घटतें आहे
माझी उंची, हिचा घेर
दिवसेंदिवस वाढतोच आहे !

# एक नाटक बसतें आहे

इथल्या महिला-मंडळांत
एक नाटक बसतें आहे
त्यांतल्या 'हि'च्या भूमिकेनें
माझें डोकें उठतें आहे...
    रोज रात्रीं प्रॅक्टिससाठीं
    मीच हिला पोंचवतों
    आणि नाटक संपेतों
    दाराबाहेर ताटकळतों
" आपलीं माणसं असलीं म्हणजे
काम कांहीं रंगत नाहीं "
या हिच्या म्हणण्यावर
माझें अपील चालत नाहीं
    मग मात्र हिचेंच म्हणणें
    बाहेरच्यांना पटवीत बसतों
    आंत प्रॅक्टिस चालू असते
    मी बाहेर उभा असतों
इथल्या महिला-मंडळांत
एक नाटक बसतें आहे
'हि'च्या त्यांतल्या भूमिकेनें
माझी झोप उडते आहे
    तिची भूमिका वठण्यासाठीं
    ती घरांत प्रॅक्टिस करते
    प्रॉम्टिंग करून करून मात्र
    नाटक माझेंच पाठ होतें

रोज हिचे दिग्दर्शक
नव्या नव्या ॲक्शन्स् सांगतात
आणि मग घरांत हिचे
तेच प्रयोग सुरूं होतात

घरांत हिच्या जोडीला
मलाच उभें राहावें लागतें
इतर प्रत्येक पात्राचें
मलाच काम करावें लागतें

त्या साऱ्यांच्या भूमिकांचें
भाषण मला पाठ आहे
त्या साऱ्यांच्या ॲक्शन्स्देखील
हिच्याकडून शिकलों आहे

आपलें सोडून सर्वांचीं
भाषणें हिला पाठ येतात
स्वत:खेरीज इतरांच्या
ॲक्शन्स् हिला छान जमतात

खऱ्या नाटकांत मी नसतां
माझ्याच चुका काढीत बसते
कोण कुठें, कसें चुकतें
हेंच मला सांगत सुटते

इथल्या महिला-मंडळांत
एक नाटक बसतें आहे
त्यांतल्या 'हि'च्या भूमिकेनें
माझें डोकें उठतें आहे !

नाटकामध्यें 'हि'च्याकडे
योग्यच काम दिलें आहे
अगदीं नॅचरल करील असें
मोलकरीणचें पात्र आहे !

आज-काल घरामध्यें
त्याच भाषेंत बोलत असते
टोप-पदरी, जुनीं-पानीं
लुगडीं नेसून वावरत असते

हिचा असला अवतार पाहून
पोरें जवळ जात नाहींत
माझ्या जवळ येते तेव्हां
माझे डोळे उघडत नाहींत

आमच्या घरची मोलकरीण
मात्र सध्या खुशींत आहे
बाईसाहेबांची एक्स्चेंजमध्यें
उंचीं पातळें नेसते आहे

पण घरांत वावरतांना
माझीच होते पंचाईत
हीच समजून तिच्यामागें
पावलें पडतात सराईत...!

चूक लक्षांत येईतों
वेळ निघून गेला असतो
कडकलक्ष्मीचा अवतार
घरामध्यें प्रगट होतो

इथल्या महिला-मंडळांत
एक नाटक बसतें आहे
त्यांतल्या ' हि 'च्या भूमिकेनें
घरांत सिनेमा रंगतो आहे

घर म्हणजे जणुं कांहीं
हिला एक स्टेजच वाटतें
दिसेल तें तें प्रत्येक माणूस
नट किंवा नटी वाटते

कधीं खरें, कधीं खोटें
मला फरक कळत नाहीं
बायको आहे कीं मोलकरीण
हेंच मला ओळखत नाहीं

इथल्या महिला-मंडळांत
एक नाटक बसतें आहे
आणि प्रत्येक मोलकरीण
मी निरखून पाहतों आहे !

# आमची बायको गाणें शिकते

आमची बायको गाणें शिकते
माझा आवाज बंद आहे
तबला आणि पेटी यांचा
घरांत आवाज घुमतो आहे...

भल्या पहाटे चारपासून
हिचा रियाज सुरूं होतो
रात्रीं बारा वाजेपर्यंत
रेडिओ सारखा चालू असतो

सकाळ, दुपार, संध्याकाळ —
तबला-पेटी वाजते आहे
तंबोऱ्याची एक तरी
तार रोज तुटते आहे

आमच्या घराच्या शेजारीं
सध्यां कोणी फिरकत नाहीं
जागा रिकाम्या असूनदेखील
भाडेकरू येतच नाहीं

आमची बायको गाणें शिकते
माझा आवाज बंद आहे
तबला आणि पेटीचाच
घरांत आवाज घुमतो आहे

रेडिओवर क्लासिकल
गायचें हिचें स्वप्न आहे
तिला माझी साथ असावी
अशी फार इच्छा आहे

खरें सांगतों शंखाशिवाय
वाद्य कधीं जमत नाहीं;
तबला–पेटी–तंबोऱ्याचें
नातें कधीं जुळत नाहीं

मोठमोठ्या तबलजींनीं
इथें हात टेकले आहेत
मला शिकवून शिकवून मात्र
त्यांचेच ताल चुकत आहेत !

मी तबला वाजवण्याचा
अनेक वेळां प्रयत्न केला
प्रत्येक वेळीं एक नवा
तबला मात्र फुटून गेला

त्या साऱ्या तबल्यांच्या
मी कुंड्या केल्या आहेत
बागेमध्यें ओळीनें
छान मांडून ठेवल्या आहेत !

आमची बायको गाणें शिकते
मी तबले फोडतों आहे
माझ्या बागेंत प्रत्येक वेळीं
एक कुंडी वाढते आहे

निदान तंबोऱ्याची तरी
छेडतां यावी मला तार
अशी अगदीं मनापासून
हिची इच्छा आहे फार

पण माझ्या हातांमध्यें
तार कांहीं टिकत नाहीं
रोज एक तरी भोपळा
फुटल्याशिवाय रहात नाहीं

या लाकडांचा बंबामध्यें
जाळ फारच छान होतो,
त्याच गरम पाण्यानें
रोज मी आंघोळ करतों

एकताल, त्रिताल, झपतालांतला
फरक मला कळत नाहीं
पेटीमधून सारेगम
मला ऐकूं येत नाहीं

शेवटीं चिडून जाऊन 'ही'
नाद माझा सोडून देते
"आमच्या ह्यांना संगीताचें
इंद्रियच नाहीं!" म्हणते!

आमची बायको गाणें गाते
क्लासिकल गाणार आहे
ऐकणाऱ्यांनो, सावधान
रेडिओवर जाणार आहे!

घरामध्यें त्याचसाठीं
नवा रेडिओ आला आहे
एकदां लावला आहे तो
अजून तसाच चालू आहे

गोवा-सिलोन-विविध भारती
हिला मुळींच चालत नाहीं
क्लासिकलखेरीज गाणें
रेडिओवर लागत नाहीं

प्रत्येकजण खाकरून खोकरून
घसा खरडून गात असतो
आत्तां रेडिओ फुटेल म्हणून
मी वाट पहात असतों

गाणें संपतां संपत नाहीं
रेडिओ काहीं फुटत नाहीं
'रॉक् ॲन्ड रोल'चें गाणें कांहीं
ऐकायाला मिळत नाहीं

कॉमेन्टरीसाठीं जेव्हां
माझा जीव तुटत असतो
त्याच वेळीं हिचा खाँसाहेब
रेडिओवर रडत असतो !

त्याचें रडणें संपण्यापूर्वींच
दोन्ही इनींग संपून जातात
माझ्यासकट सारे बॅटस्मन्
'क्लीन बोल्ड' औट होतात !

आमची बायको गाणें शिकते
माझी मॅच चुकते आहे
रेडियोवर रेकून रेकून
क्लासिकल चालू आहे...

गवईबुवा रोज येतात
तीन तीन तास शिकवीत असतात
दहा बारा वर्षांत नक्की
हिला गाणें येईल म्हणतात !

हें असेंच चाललें तर
मी कांहीं टिकत नाहीं
डायव्होर्स घेईन म्हटलें तर
एवढें कारण पुरत नाहीं !

आमची बायको गाणें शिकते
माझा आवाज बंद आहे
तबला-पेटी-तंबोरा अन्
रेडिओ घरांत वाजतो आहे !

# आमची बायको शिवण शिकते

आमची बायको शिवण शिकते !
तुमचे कपडे आहेत का ?
आमच्या घरीं मशीन आणलय्
एकदां ट्रायल देतां का ?

गेलं वर्षभर हिची
सारखी चालू होती कटकट
" घरांत मशीन असलं म्हणजे
कपडे शिवून होतात झटपट ! "

बजेटमध्यें बसत नव्हतं
तरी हिनं नाहीं ऐकलं
हप्त्यावरतीं मिळणारं
एक मशीन शोधून काढलं !

महिनाभर त्याचंच गणित
हिच्या तोंडून ऐकतों आहें
दहा वर्षांत वीस टक्के
व्याज म्हणे सुटणार आहे !

पायजम्याच्या अर्ध्या चड्डया
एक तासांत शिवून देते
शर्ट फाडून फॅशनेबल
रुमालदेखील शिवून देते

सूटपँटच्या पायांच्या
हिला छान पिशव्या येतात,
धान्यधुन्य आणण्यासाठीं
त्या फारच दणकट असतात !

नव्या नव्या पातळांचे
पडदे करून घेतां का ?
धोतरें फाडून त्यांचे छान
नेहरू शर्ट हवेत का ?

हिच्या हातांमधून एकही
कपडा कधीं सुटला नाहीं
वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीला
मशीन हार जात नाहीं

बाजारांतून रोज नवा
तयार कपडा विकत आणते
तो सगळा शिवणीमधून
मान मोडून उसवीत बसते

उसकटलेल्या त्या तुकड्यांचीं
डोळे फाडून मापें घेते
त्यांच्यावरतीं नवीन कपडा
ठेवून ठेवून कातरीत बसते

इतक्या साऱ्या खटपटींतून
जें कांहीं तयार होतें
तें सारें वापरण्याची
आमच्यावरतीं पाळी येते

आजकाल तेच कपडे
आमचीं पोरें वापरतात
माझ्या अंगावरतींदेखील
तेच नवे कपडे असतात

मशीन घेतल्यापासून मात्र
एक फायदा झाला आहे
आपलं तोंड शिवून घेऊन
' ही ' शिवणांत गर्क आहे !

याच एका कारणासाठीं
सारें सहन करतों आहें
रोज तोंड देण्यापेक्षां
हें पुष्कळ बरें आहे !

एक तरी रीळ रोज
मशीनवर गुंता होते
चाकावरची वादी रोज
एकदां तरी हटकून तुटते

रोज रोज हिच्या बोटांत
किती सुया मोडत असतात
तरी बरं, बांधण्यासाठीं
खूप कोऱ्या चिंध्या असतात !

दाही बोटें बांधल्या स्थितींत
ही शिवण शिकत असते
आणि मग कपड्यांमध्यें
नवी नवी फॅशन होते !

# आमची बायको नोकरी करते

आमची बायको नोकरी करते
तुमची बायको करते का ?
माझा अनुभव सांगतों आहे
तुमचा तुम्ही सांगाल का ?

मिळवती मुलगी–दुभती गाय !
म्हणून हुंडा मिळाला नाहीं,
हिला रजा नव्हती म्हणून
लग्न थाटांत झालंच नाहीं

खटपट करून जेव्हां माझी
हिच्याच गांवीं बदली झाली
तेव्हां कुठं माझी–तिची
खऱ्या अर्थीं भेट झाली !

माझ्यापेक्षां हिचा पगार
तसा खूपच जास्त आहे
आणिक हिची नोकरीदेखील
माझ्यापेक्षां मस्त आहे !

महिन्याकांठीं एकवीस दिवस
हिची फिरती चालू असते,
जीप आणि प्यून घेऊन
ही मोठ्या ऐटींत फिरते !

पगार जास्त, नोकरी मस्त
याचा हिला ताठा आहे

आणि माझ्या नोकरीबद्दल
हिच्या मनांत कांटा आहे

आमची बायको नोकरी करते
पैसा मिळवून आणते आहे
आपल्यामुळेंच घर चालतें
अशी तिची खात्री आहे

माझ्याबद्दल सांगत असतां
हिला म्हणे लाज वाटते
मी नोकरी सोडून द्यावी
असें हिला नेहमीं वाटतें

" तुम्ही नोकरी सोडली म्हणजे
घर तरी छान राहील
आणि माझ्या मागची घरची
काळजी तरी दूर होईल ! "

या हिच्या म्हणण्यामधला
मला विचार पटला आहे,
हिच्याच सल्ल्यावरून मी
राजीनामा दिला आहे

मीच घरीं असल्यामुळें
घरचे गडी काढून टाकले
खानावळीचे डबे आणणें
आतां आम्हीं बंद केलें

घरामधली उधळ-माधळ
आतां कमी झाली आहे

एकव्या एका मुलावरही
माझंच आतां लक्ष आहे

मीच घरांत असल्यामुळें
केवढा खर्च वाचतो आहें !
शिवाय हिच्या मनांत आतां
माझ्याबद्दल आदर आहे !

एकवीस दिवसांपेक्षां जास्त
हिला फिरती आतां जमते
जीप आणि प्यून यांची
जास्त सेवा घेतां येते !

नोकरीपाठीं एकवीस रात्री
' ही ' बाहेरगांवीं असते
इतर दिवशीं दमून भागून
फार लवकर झोपीं जाते

त्यामुळें आमच्या घरांत
नियोजनाचा प्रश्नच नाहीं
चुकून एक झाला आहे,
त्याला आई ठाऊक नाहीं

आमची बायको नोकरी करते
मीच गृहिणी बनलों आहें
एकव्या एका मुलाची
मीच आई झालों आहें !

# आमची बायको प्रवास करते

आमची बायको प्रवास करते
तुम्ही कधीं पाहिलीत काय ?
बायको प्रवास करते याचा
अनुभव तुम्ही घेतलाय् काय ?

प्रवासाला जायचें म्हणतांच
' ही 'ची कळी एकदम खुलते
आणि मग निघेपर्यंत
ही गेल्यापैकींच असते !

वर्षाकांठीं अनेक वेळां
घरांत असला प्रसंग येतो
बहुतेक माझा सारा पगार
हिच्या प्रवासांतच जातो

एकटा प्रवास करणें हिला
मुळींच पसंत पडत नाहीं
' साही ' पोरें घेतल्याशिवाय
कधींच प्रवास करीत नाहीं

तरी बरें, प्रवासांत
मी सोबत नको असतों
आणि माझा तेवढाच काळ
घरामध्यें सुखांत जातो

प्रवासपूर्व आठ दिवस
घरांत गोंधळ चालू असतो
कसें जायचें, काय न्यायचें
सारखा प्लॅन बदलत असतो

'बस' किंवा 'रेल्वे' यांचा
नक्की बेत ठरत नाहीं !
तरी बरें, आमच्या गांवीं
विमानाची सोय नाहीं !

शेवटीं आपली एस्. टी. च बरी
असा हिचा निर्णय ठरतो
वार, दिवस, तारीख, वेळ
यांचा घोळ घातला जातो

दिवस, वेळ ठरल्यानंतर
रिझर्वेशन मीच करतों
पुढच्या दोन गाड्यांचेंही
रिझर्वेशन करून ठेवतों

कारण ठरवलेली गाडी
चुकणार याची खात्री असते
मात्र जायचें चुकूं नये
अशीच माझी इच्छा असते

सामानाची बांधाबांध
चार दिवस चालू असते
एकूण नग किती याचें
गणित सारखें सुरू असतें

पोरें, बाळें, सामानसुमान
यांचा मेळ बसत नाहीं
सावळा गोंधळ, नाचानाच
प्रवासभर चुकत नाहीं

ऐन वेळीं स्टँडवर
कांहीं तरी आठवण करते
कमींत कमी चार वेळां
मला घरीं यावें लागते

रेल्वेपेक्षां एस्. टी. गाडी
हिला जरा कमी 'लागते'
तरीदेखील त्याच्यासाठीं
खूपच काळजी घ्यावी लागते

प्रवासाच्या आधल्या दिवशीं
हिचा कडक उपास असतो
ॲव्होमीनच्या गोळ्यांचाही
सतत मारा चालू असतो

शिवाय प्रवासभर हिचा
एक उपाय चालूच असतो
सतत 'चरत' राहण्याचा
हिचा उद्योग सुरूच असतो

असें सतत 'चरलें' म्हणजे
प्रवास कधींही लागत नाहीं
हा उपाय कळल्यापासून
हिला भीतीच वाटत नाहीं

हमालाचा आणि हिचा
सौदा कधींच जमत नाहीं
सामान वाहून नेण्याबद्दल
भांडण कधीं चुकत नाहीं

एस्. टी. मधल्या कंडक्टरशीं
हिचें नेहमीं भांडण होतें
आणि त्यांत प्रत्येक वेळीं
त्यालाच पड खावी लागते !

'बारा वर्षांखालचींच सारीं
साही पोरें आहेत' म्हणते
'अर्ध्या सिटा' ठरवायसाठीं
नाना सबबी सांगत सुटते !

तरी बरें आपलें तरी
पूर्ण तिकीट मागून घेते
या साऱ्या घोळामध्यें
पोर एखादें राहुन जातें !

सामानाच्या डागांवरतीं
पूर्ण पत्ते चिकटवुन घेते
पोरांच्याही सदऱ्यांवरतीं
तसेच पत्ते टांचून देते

प्रवासाच्या अखेर समयीं
डाग एकादा हरवून बसते
नशीब शिकंदर म्हणून म्हणा
पोरें मात्र शाबूत आणते !

## आमची बायको सायकल शिकते

आमची बायको सायकल शिकते
रस्त्यांत पोरें सोडूं नका
आधींच सांगून ठेवतों आहे
नंतर तक्रार आणूं नका !

सायकलीच्या पुढें मागें
तांबडे [ L ] लावले आहेत
आंधळ्यालाही वाचतां येतील
एवढे मोठ्ठे बोर्ड आहेत !

‘ सायकल शिकावी ग्राउंडवर ’
म्हणणें हिला पटत नाहीं
कारण इथलें ग्राउंड म्हणे
कधींच मोकळें असत नाहीं !

सकाळ–दुपार ग्राउंडवर
क्रिकेट–हॉकी चालू असते
संध्याकाळीं पहावें तों
रोमियोंची गर्दी असते !

चांदण्याच्या रात्रीं म्हणे
कुजबुज, किलबिल फार असते
तशांत सायकल चालवण्याची
हिलाच म्हणे लाज वाटते !

18842



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
78623 दि:
2008 नों दि: 9/8/13

तेव्हां हिनेंच विचार केला
रस्ता काय, आपलाच आहे !
शिवाय वेळप्रसंगाला
प्रत्येक माणूस घरचेंच आहे !

म्हणून सध्यां रस्त्यावरतीं
हिची सायकल धांवत असते
मागें पुढें पाहून चाला
आमची बायको सायकल शिकते !

शिकावू सायकल देत असतां
दुकानवाला तक्रार करतो
दुप्पट भाडें घेऊन वरतीं
मोडतोडीचे पैसे घेतो

आतां तर अनुभवानें
सायकल कोणी देतच नाहीं
ओळख आणिक डिपॉझिटही
ठेवून देखील भागत नाहीं

म्हणून शेवटीं हिच्यासाठीं
लेडी–सायकल घेतली आहे !
दर दोन दिवसांनीं ती
एकदां तरी मोडते आहे

आजपर्यंत जेवढा खर्च
झाला आहे सायकलवरतीं
तेवढ्यामध्यें एक तरी
मोटार सहज आली असती !

गेले सहा महिने हिचें
सायकल शिकणं चालू आहे
आत्तां कुठें सायकलीशीं
हिचें नातें जुळतें आहे

हिच्या सायकल शिकण्यामध्यें
अनेक अपघात झाले आहेत
हिचे आणि सायकलीचे
अनेक पार्टस मोडले आहेत

त्या दोघींच्या रिपेरींत
इतकी रक्कम खर्च होते
तेवढ्या पैशांत हिचें एक
बाळंतपणही झालें असतें !

बऱ्याच दिवसांनंतर आत्तां
हिला बॅलन्स जमतो आहे
माझा आधार घेतल्याखेरीज
सायकल धावूं शकते आहे

पण अजून मदतीशिवाय
सुरुवात कांहीं जमत नाहीं
एकदां बसवून दिल्यानंतर
मग मात्र ऐकत नाहीं

सीटवरतीं बसवून देऊन
हिला लोटून द्यावें लागतें
जेथें जायचें असतें तेथें
खालतीं उतरून घ्यावें लागतें !

‘ ब्रेक ’ नामक गोष्टीवरतीं
हिचा मुळींच विश्वास नाहीं
झाड किंवा माणसाशिवाय
हिची सायकल थांबत नाहीं !

सायकलला एक घंटा असते
याचें हिला भानच नसते
अधुनमधून हिचें आपलें
किंचाळणेंच चालू असतें

म्हणून म्हणतों रस्त्यावरती
मागें पुढें पाहून चाला
हिची सायकल आली तर
जीव मुठींत घेऊन पळा

आमची बायको सायकल शिकते
रस्त्यांत पोरें सोडूं नका
आधींच सांगून ठेवतों आहे
नंतर तक्रार सांगूं नका...!

# आमची बायको वैताग करते

आमची बायको वैताग करते
तुमची कधीं करते का ?
हिला कारण लागत नाहीं
तुमची कारण सांगते का ?

हिला वैताग करण्यासाठीं
कारण कांहींच लागत नाहीं
डोक्यांत राख घालण्याकरतां
काळवेळ लागत नाहीं !

वैताग प्रगट करण्याच्या
हिच्या अनेक तऱ्हा असतात
प्रत्येक वेळीं हिच्या अंगच्या
नव्या नव्या कळा दिसतात

कधीं आदळआपट करते
कधीं 'शब्द' बोलत नाहीं
कधीं नुसती झोपून राहते
काय करेल सांगवत नाहीं

केस सारे विस्फारून
डोळे गरगर फिरवते
भोकरासारखे डोळे करून
सारखी मला दटावते

तिच्यापुढें पोरासारखा
मी निमूट उभा राहतों
दीनवाणा चेहरा करून
भिजल्या कुत्र्यासारखा होतो ! !

‘ शट् अप् ’ आणि ‘ चूप रहा ’
सारखे तिचे हुकूम सुटतात
जाड जाड तिचे ओठ
रागावतांना थरथरतात

कमरेवरतीं हात घेऊन
अशी कांहीं उभी असते
जसे कांहीं सगळे ‘ नवरे ’
पाटींत भरून फेकणार असते !

वैतागलेल्या स्थितींत जेव्हां
घर डोक्यावरतीं घेते
घरामधल्या प्रत्येकाची
पांचावरती धारण बसते

जरी दिसते गोगलगाय
तेव्हां जणुं वाघीण बनते
आणि हिच्या डरकाळ्यांनीं
घर सारें हादरून जातें

हिचा केव्हां भडका उडेल
त्याचा नेम सांगवत नाहीं
ज्याच्यावरतीं तडकेल त्याची
धडगत कांहीं रहात नाहीं

हिची दृष्टी जेव्हां जेव्हां
पोरांबाळांकडे वळते
चळचळ कांपत प्रत्येक पोर
आपली चड्डी ओली करतें

मुलें अभ्यास करीत नाहींत
एवढें कारण तिला पुरतें
पोरें चहा पितात म्हणून
हिचें तांडव सुरू असतें

मोलकरणीचा खाडा होतो
किंवा दूध-रतीब चुकतो
तेव्हां हिच्या वैतागाचा
रंग कांहीं औरच असतो !

भैयावरच्या रागानें ही
बिन्-दुधाचा चहा करते
आणि स्वतःबरोबरच
आम्हांलाही तोच पाजते

मोलकरणीच्या वरचा राग
घरच्या भांड्यांवरतीं निघतो
आणि प्रत्येक भांड्यावरतीं
एक नवा पोचा येतो !

हिच्या वैताग-रागावरतीं
निश्चित असा उपाय नाहीं
आजचा उपाय उद्यां अपाय
ठरल्याशिवाय रहात नाहीं

ही केव्हां शांत होईल
तेंही सांगणें कठीण असतें
मात्र शांत झाल्यावरतीं
त्याची आठवण द्यायची नसते

कारण तेवढें निमित्तदेखील
पावव्यासारखें हिला पुरतें
आणि हिच्या वैतागाला
पुन्हां एकदां तोंड फुटतें

एवढें सगळें असलें तरी
एक मात्र खरें असतें
वैतागलेल्या स्थितींतही,
खरोखरीच सुंदर दिसते !

पण याचा त्या वेळीं
कांहींच उपयोग असत नाहीं
अशा वेळीं जवळ जायचें
माझ्यांत धाडस असत नाहीं !

अशा वेळीं एकच गोष्ट
मी नेहमीं करीत असतों
आरामखुर्चीमध्यें बसून
सारी गम्मत पहात असतों !

हिचा थैमान चालू असतो
माझा वेळ छान जातो
समोर एक सुंदर प्रवेश
तासन् तास चालूं असतो !

# आमची बायको दौरा करते

आजकाल आमची बायको
समाज-सेवा करते आहे
आणि माझ्या मागें मात्र
नसता उद्योग लागला आहे

सभा आणिक सम्मेलनें
हिच्या पांचवीस पुजलीं आहेत
डायरीमध्यें त्यांच्या नोंदी
मीच नित्य ठेवतों आहे

रोज सत्रा कामांची
हिच्या मागें गर्दी असते
आणिक घर सांभाळण्याची
अर्थात् माझीच पाळी असते

कुठें 'व्याख्यान', कुठें 'चर्चा'
कुठें 'परिसंवाद' असतो
कुठला 'क्लब', कुठलें 'मंडळ'
आठवायलाही वेळ नसतो !

रोज भले मोट्ठे हार
गळ्यांत घालून परत येते
दारामध्यें स्वागतासाठीं
मलाच उभें रहावें लागतें

रोज नव्या फंडासाठीं
देणग्या जाहीर करीत असते
मुकाट्यानें पैसे भरून
मलाच पावती घ्यावी लागते !

कुठें चिटणीस, कुठें अध्यक्ष
कुठें आहे खजिनदार
जेथें जेथें जाते तेथें
हिला आहे भलताच मान !

सभांमधून रोज नवे
फर्डे विचार मांडत असते
प्रत्येक वेळीं नवें भाषण
माझ्याचकडून लिहून घेते

हिच्या व्याख्यानांचे रिपोर्ट
मलाच छापून घ्यावे लागतात
छापून आल्यानंतर कापून
नीट ठेवून द्यावे लागतात !

हळूहळू हिची सेवा
सरकारमान्य झाली आहे
अधून मधून दिल्लीचीही
वारी सध्यां होते आहे !

हिच्या समाजकार्याचा
इतका डंका झाला आहे
मंत्र्यांनाही आजकाल
हिचा धाक वाटतो आहे !

हिच्या समाजसेवेचें
कांहीं थोडें चीज म्हणून
हिची निवड झाली आहे
खुद्द केंद्र सरकारकडून !

परदेशांच्या दौऱ्यावर
शिष्टमंडळ जायचें आहे !
भारताच्या संस्कृतीचें
दर्शन घडवून यायचें आहे !

पंधरा हजार मैलांवरतीं
चार ' शिष्ट ' स्त्रिया जातील
त्यांच्या नेत्या म्हणून आमच्या
बाईसाहेब चार्ज घेतील

कमींत कमी पन्नास हजार
यांच्या नांवें खर्च होतील
तेवढ्यामध्यें चौघीजणी
साऱ्या जगभर फिरून येतील

देशोदेशींच्या लोकांना
यांनीं दर्शन द्यायचें आहे
भारताच्या संस्कृतीची
ओळख पटवून द्यायची आहे

चौघीजणींत चार कामें
आत्तांच वांटून दिलीं आहेत
हिच्याकडे काम आहे
त्याचाच अभ्यास चालू आहे

रोज नव्या फंडासाठीं
देणग्या जाहीर करीत असते
मुकाट्यानें पैसे भरून
मलाच पावती घ्यावी लागते !

कुठें चिटणीस, कुठें अध्यक्ष
कुठें आहे खजिनदार
जेथें जेथें जाते तेथें
हिला आहे भलताच मान !

सभांमधून रोज नवे
फर्डे विचार मांडत असते
प्रत्येक वेळीं नवें भाषण
माझ्याचकडून लिहून घेते

हिच्या व्याख्यानांचे रिपोर्ट
मलाच छापून घ्यावे लागतात
छापून आल्यानंतर कापून
नीट ठेवून द्यावे लागतात !

हळूहळू हिची सेवा
सरकारमान्य झाली आहे
अधून मधून दिल्लीचीही
वारी सध्यां होते आहे !

हिच्या समाजकार्यांचा
इतका डंका झाला आहे
मंत्र्यांनाही आजकाल
हिचा धाक वाटतो आहे !

हिच्या समाजसेवेचें
कांहीं थोडें चीज म्हणून
हिची निवड झाली आहे
खुद्द केंद्र सरकारकडून !

परदेशांच्या दौऱ्यावर
शिष्टमंडळ जायचें आहे !
भारताच्या संस्कृतीचें
दर्शन घडवून यायचें आहे !

पंधरा हजार मैलांवरतीं
चार ' शिष्ट ' स्त्रिया जातील
त्यांच्या नेत्या म्हणून आमच्या
बाईसाहेब चार्ज घेतील

कमींत कमी पन्नास हजार
यांच्या नांवें खर्च होतील
तेवढ्यामध्यें चौघीजणी
साऱ्या जगभर फिरून येतील

देशोदेशींच्या लोकांना
यांनीं दर्शन द्यायचें आहे
भारताच्या संस्कृतीची
ओळख पटवून द्यायची आहे

चौघीजणींत चार कामें
आत्तांच वांटून दिलीं आहेत
हिच्याकडे काम आहे
त्याचाच अभ्यास चालू आहे

गळ्यामध्यें मंगळसूत्र
कपालाला लाल कुंकू
नऊवारी पातळ नेसून
सदा हिनें रहायचें आहे !

अंगामध्यें घालायची
चोळी नऊ तुकड्यांची
नाकामध्यें घालणार आहे
नथ चौदा मोत्यांची !

दुसरी एक शिष्ट बाई
पान खाऊन थुंकत राहील
भारतीय लिप्स्टिकचें
दर्शन तिकडे घडवीत राहील !

विविध प्रांतांच्या चालीरीती
सध्यां चौघी शिकत आहेत
त्यांच्यासाठीं प्रांतोप्रांतीं
आधीं दौरे आंखले आहेत !

शिष्टमंडळाचा दौरा
जेव्हां एकदां सुरू होईल
हिच्या समाजकार्याचेंही
तेव्हांच खरें चीज होईल !

हिची निवड झाल्यापासून
सत्कारांना जोर आहे
हिचा नवरा म्हणून मला
सध्यां थोडा मान आहे !

## स्पर्धांसाठीं पूर्वतयारी

इथल्या महिला-मंडळाचें
संमेलन होणार आहे
आणि त्याच वेळीं मंडळ
विविध स्पर्धा घेणार आहे

मंडळाच्या प्रत्येक स्पर्धेंत
हिनें नांव नोंदलें आहे
आमची बायको आत्तांपासून
तयारीला लागली आहे

हिची तयारी पहात असतां
मला नेहमीं वाटत असतें
ऑलिंपिकचे सर्वच सामने
हिनें सहज जिंकले असते !

लिंबू-चमचा स्पर्धेसाठीं
हिची प्रॅक्टिस चालू असते
तोंडामध्यें चमचा ठेवून
सारखी घरभर धांवत असते

प्रत्येक वेळीं ताजें लिंबू
पायाखालीं फुटत असतें
बाजारांतून डझनावारी
लिंबें रोज विकत आणते

गाढव-शेपूट स्पर्धेसाठीं
प्रॅक्टिस सारखी चालू असते
रोज एक नवें गाढव
मला काढून द्यावें लागतें

डोळ्यांवरतीं पट्टी बांधून
गाढवाजवळ न्यावी लागते
मी हात सोडतां क्षणीं
मलाच ही चांचपूं लागते ! !

भरली घागर डोक्यावरतीं
सावरण्याची स्पर्धा आहे
त्याची प्रॅक्टिस करतांना ही
अनेक वेळां भिजते आहे

हिला ओलीचिंब पाहून
मला काव्य स्फुरतें आहे
ठुमकणारी राधा गौळण
रोज दृष्टीस पडते आहे

संगीत-खुर्ची स्पर्धेसाठीं
बाजापेटी आणली आहे
माझें पेटीवादन आणि
हिचें पळणें चालू आहे

खुर्च्यांमध्यें पाय अडकून
अनेक वेळां पडते आहे
मी पाहून हंसतों म्हणून
माझ्यावरतीं चिडते आहे

ढिगाऱ्यांतून आपलीच चप्पल
हुडकण्याची स्पर्धा आहे
त्यांत हिचाच नंबर लागेल
याची मला खात्री आहे

कारण तेवढ्यासाठींच हिनें
नवीन चपला घेतल्या आहेत
पांढरे पट्टे, लाल गोंडे
मुद्दाम लावून घेतले आहेत

डोळे बांधून तीन घावांत
माठ फोडणें चालू असते
रोज फुटक्या मडक्यांची
घरामध्यें रास पडते

डोळे बांधून हिच्या हातीं
एक लाठी द्यावी लागते
स्वतःभोंवतीं गरगर फिरवीत
जरा दूर न्यावी लागते

बहुतेक हिच्या पायांखालींच
सारे माठ फुटून जातात
मात्र हिच्या लाठीखालीं
अनेक डोकीं शेकलीं जातात

नांव घ्यायच्या स्पर्धेमध्यें
हिला एकच अडचण वाटते
माझें नांव ' फारच लांब '
असल्याची ही तक्रार करते

रोज नवे उखाणे ही
माझ्याकडून लिहून घेते
आजकाल उखाण्यांतच
मला हांका मारीत असते

कमींत कमी वेळामध्यें
नऊवारी नेसण्याचा
गतवर्षींचा विक्रम यंदा
हिला आहे मोडायचा

त्याच्यासाठीं घड्याळ लावून
नऊवारी नेसत असते
घड्याळांतला वेळ पाह्यचें
माझ्याचकडे काम असतें

पण अशा वेळीं माझें
घड्याळांत लक्षच नसतें
हिला पहात असतां मला
नवें काव्य स्फुरत असतें

मंडळाच्या प्रत्येक स्पर्धेत
हिनें भाग घेतला आहे
आमची बायको आत्तांपासून
तयारीला लागली आहे

हिची तयारी पहात असतां
मला स्वप्न पडतें आहे
ऑलिंपिकचें गोल्ड मेडल
हिनें मिळवून आणलें आहे !

# माझी उ(ब्र)दार नायिका

आमची बायको आजकाल
' उबदार कथा ' लिहिते आहे
ज्याच्या त्याच्या तोंडामध्यें
हिचें नांव घोळतें आहे

' ताई ', ' बाई ', ' सखी ' यांचे
अंक हिच्याचमुळें खपतात
' आई-बाबा ', ' इकडम्-तिकडम् '
अंक हिच्याचमुळें सजतात

' विंझण ', ' नेमका ', ' पल्करा 'च्या
प्रत्येक अंकांत गोष्ट असते
' अंगदर्शन ', ' धंदा 'मध्यें
कायम लिहिणें चालू असतें

' रती ' आणिक ' मस्ती 'मध्यें
हिचा नेहमीं रतीब असतो
हिच्या उबदार कथांमध्यें
रोज नवा ढंग असतो

चोरून मारून हिच्या गोष्टी
प्रत्येकजण वाचीत असतो
चारचौघांमध्यें मात्र
आपलें नाक मुरडीत असतो

कॉलेजमधलीं पोरेंपोरी
गोष्टीवरतीं मरत असतात
हिचें नांव वाचतांक्षणीं
मासिकांवर झडप टाकतात

खरं सांगतों, पूर्वीं असलं
उबदारविबदार लिहीत नसे
लोक सारखे विचारतात
' तर मग असें झालें कसें ? '

सारं सारं आतां एकदां
खरं खरं सांगणार आ
हिच्या उबदार कथांमधलं
रहस्य उघडं करणार आहें

अहो, पूर्वीं एके काळीं
' सभ्य कथा ' ही लिहीत असे
तेव्हां हिच्या गोष्टींकडे
ढुंकून कोणी पहात नसे

बहुतेक सारीं मासिकें त्या
' साभार परत ' पाठवीत असत
चुकून कोणी छापलीच तर
अंकसुद्धां पाठवीत नसत

कशी कुणास ठाऊक, हिला
एक दिवस युक्ति सुचली
रात्रभर बसून हिनें
एक ' शृंगार-कथा ' लिहिली

शैली किंवा कथानक
असें त्यांत कांहींच नव्हतें
चुंबनें नि आलिंगनें
यांचेंच पेंव फुटलें होतें

पुष्ट उरोजांचें वर्णन
अधूनमधून केलें होतें
नायक आणि नायिकेचे
चोरटे प्रेमप्रसंग होते

नायिकेला पावसामध्यें
ओलीचिंब केली होती
कपडे बदलतांना तिला
वाचकांपुढें आणली होती

एक चावट मासिक पाहून
हिनें कथा पाठवून दिली
लगेच कथास्वीकृतीची
भली-मोठ्ठी पोहोंच आली

तेव्हांपासून ' तसल्या ' मासिकांत
हिचा भाव वाढतो आहे
त्यांना ' माल ' कसला लागतो
हिला अचूक कळलें आहे

आजकाल दिवसरात्र
सारख्या कथा लिहिते आहे
आणि हिची लेखणी आतां
भलतीच स्वैर सुटली आहे !

‘ शृंगार-कथा ’, ‘ शीण-गार ’ कथा
‘ नग्न-कथा ’ लिहिते आहे
‘ वियोग–कथा ’, ‘ प्रयोग- कथा ’
‘ अंधार–कथा ’ पाडते आहे

परकें वाङ्मय रद्दी भावांत
नेहमीं विकत आणीत असते
शृंगाराची फोडणी देऊन
तेंच उतरून काढीत असते

हिच्या ‘ उबदार कथां ’मध्यें
सारीं स्फोटक द्रव्यें असतात
लग्नपूर्व संबंध आणिक
स्वैराचारी स्त्रिया असतात

लग्न-बाह्य संबंधांत तर
हिचा हातखंडाच आहे
त्यांतल्या हिच्या सफाईनें
मीही थक्क होतों आहें

हिच्या असल्या कथांचा मी
अगदीं पहिला वाचक असतों
मी वाचून पेटलों तरच
ही कथा पाठवीत असते

अधून मधून हिचें नांव
खटल्यामधून घेतलें जातें
आणि हिच्या कथांना मग
फारच मोठ्ठी मागणी येते !

प्रेझेंट म्हणून कोणी हिला
सेंटची बाटली पाठवून देतो,
तर कोणी टेलिफोनचा
नंबरदेखील कळवून ठेवतो

अनेकजण पत्रांमधून
लाडांत येऊन फोटो मागतात
कथांमागील अनुभूतींची
अनेकजण पृच्छा करतात

या साऱ्यांचा हिच्यावरतीं
फारच परिणाम झाला आहे
हिच्या बोलण्यावागण्यामध्यें
भलताच फरक पडला आहे

हिला वाटतें, आपण जणूं
कथेमधली नायिकाच आहों
आणिक आपला नवरा म्हणजे
कथेमधला नायक आहे

आपले केस पांढरे झालेत
हें ही सध्यां विसरून जाते
नवरा पेन्शनमध्यें गेलाय्
याची हिला आठवण नसते

नटूनथटून सायंकाळीं
फिरण्याचा ही हट्ट धरते
रस्त्यावरतीं लाडांत येऊन
मलाच धक्के मारीत असते

आमची बायको कथा लिहिते
फारच कीर्ति झाली आहे
उबदार कथा लिहितां लिहितां
स्वतःच तरुण बनली आहे !

## तूं आज नाहींस

—तूं आज नाहींस
आणि मला कसं मोकळं, मोकळं, मोकळं वाटतं आहे !
सकाळच्या स्टोव्हच्या फरफराटांत,
आणि तुझ्या कडकडाटांत,
साखरझोपेचं आज खोबरं होणार नाहीं !
उकळल्यामुळें आमटी बनलेला,
साखरेमुळें मुरांबा झालेला,
कमी दुधाचा आणि धुरकटलेला,
तुझ्या हातचा कोमट चहा,
हंसतमुखानं ' किती छान ! ' म्हणून आज घशांत ओतायला नको !
खरंच किती सुटल्या, सुटल्या, सुटल्यासारखं वाटतंय् मला !
घराबाहेर पडण्यासाठीं नेहमींच आतुर अशा माझ्या पावलांना
रेंगाळण्याचं नाटक करण्याची आज गरज नाहीं,
किंवा उशीरा घरीं परत येतांना
तुझ्या तोफखान्याला तोंड देण्यासाठीं,
कुणाच्या तरी मित्राच्या बरोबर
हळूच घरीं प्रवेश करण्याचंही आज कारण नाहीं
आज किती स्वतंत्र आहें मी !
—दुपारच्या त्या जेवणाच्या रम्य वेळीं
आमटींतली न शिजलेली डाळ;
आणि भातांतले दांत पाडणारे खडे
यांच्याबद्दल उगाचच वाण्याचा उद्धार करण्याची आज गरज नाहीं
—तुझ्या ऑफीसची वेळ साधण्यासाठीं
तुझी कुठं तरी पडलेली पर्स

कुणाकडे तरी राहिलेले सॅन्डल्स्
तुझं रिकामं पेन, ऑफीसचे कागद
हें सारं शोधून देण्यांत माझी होणारी तारांबळ
आजचा दिवस तरी टळणार आहे
खरंच कित्ती मोकळा आहें मी ! कित्ती रिकामा ! !
आणि सायंकाळचा तो तुझा हिंदीचा क्लास
तो संपेपर्यंत आज घरीं तिष्ठत बसायला नको
आज अगदीं मोकळेपणानं
कुणाबरोबरही
कुणीकडंही
कितीही वेळ फिरायला मी मोकळा आहें
खरंच किती मोकळेपणा हा !
पण या मोकळेपणाला तुझी सतत जाणीव आहे
या अनिर्बंधांत बंधनाची आठवण आहे
खरंच तूं आज असतीस तर
तर याच मोकळेपणाला आगळीच खुमारी आली असती नाहीं ?

## तूं उद्यां येणार

—तूं उद्यां येणार
आणि माझी अजून कांहींच तयारी नाहीं !
दोरीवरच्या कपड्यांचीं हीं लक्तरें परटाकडे जायला हवींत,
टेबलावरची ही पुस्तकांची चवड कपाटांत जायला हवी;
ही दाढी, ही तुटकी चप्पल, ही छत्रीची तुटलेली तार !
आणि तूं तर उद्यांच येणार !
—कॅलेंडरवरची ही छचोर नर्तकी आज तीन महिने झाले
जगाच्या मागेंच राहिली आहे
तिच्या अधीऱ्या पावलांना आजचा महिना तरी दाखवयाला हवा
भिंतीवरचं बंद पडलेलं हें घड्याळ पुन्हां चालतं करायला हवं
कंदिलाची फुटलेली कांच !
रॉकेलचा संपलेला डबा
विटलेल्या कपबशांचे फुटलेले कान
बाप रे, तूं तर उद्यांच येणार...!
—ती तावदानाची फुटलेली कांच,
केव्हांपासून बसवून घ्यायची म्हणून घोकतों आहे !
स्टोव्हच्या तेलमार्गांत अडकून बसलेली पीनची तुटकी तार
युगेंन् युगें तिथेंच आहे.
गंजलेल्या पिपाला डांबर लावायला हवं
ओल्या कोळशांना ऊन्ह द्यायला हवं
दारावरच्या वाळून चाललेल्या वेलींना पाणी
आणि तूं तर उद्यांच येणार...!
—वेळ कसा विमानासारखा धांवतो आहे
कामं कशीं भुतासारखीं भेडसावीत आहेत

काय करूं ?
कसं करूं ? ?
किती करूं ? ? ?
केव्हां करूं ? ? ? ?
हें आधीं कां तें आधीं ?
कांहीं एक सुचत नाहीं
असाच वेळ निघून जाईल
आणि तूं तर उद्यांच येऊन थडकशील
पण खरंच,
उद्यांऐवजीं आजच आली असतीस तर ?
तर हें सारं काम कसं झटपट आवरलं असतंस
आणि मग ' तूं उद्यां येणार ' याची मला भीतीच वाटली
नसती !

# आमचे मिस्टर कविता करतात

आमचे मिस्टर कविता करतात
सांगायची देखील वाटते लाज
विषय काय, तें कसं सांगू ?
यांना मुळींच नाहीं लाज

नवकाव्याच्या प्रांतांत म्हणे
हे करणार आहेत विक्रम !
बाकी काय असेल तें असो,
घरांत मात्र वागतात चक्रम !

विषय शोधण्यासाठीं म्हणून
गल्लोगल्लीं हिंडत असतात
रिबिना आणि आंकड्यांचे
ढीग घरीं आणून रचतात

'ही रिबीन अश्शी लाव,'
'तो आंकडा तस्सा ठेव,'
'अश्शी बैस आणि तश्शी हांस'
म्हणून छळतात पतिदेव !

त्यांच्या कवितांत म्हणे त्यांना
वर्णन हवं प्रत्ययकारक
म्हणून म्हणे मी बसावं
मॉडेल बनून त्यांच्यासमोर !

कोण कुठल्या सटव्यांची
मला चरित्रं सांगत बसतात
त्यांच्या चावट चाळ्यांचेंही
गुणगान रोज गात असतात !

कवितेचा झटका यांना
केव्हां येईल सांगवत नाहीं
जेवणखाण वगळून मात्र
बाकी मग शुद्धच नाहीं !

माझ्याजवळ रोज रोज
पैशांसाठीं धरणें धरतात
पोस्टेजसाठीं दिवसाकांठीं
दोनतीन रुपये खर्च करतात

रोज दुपारीं टपालांतून
लखोट्यांवर लखोटे येतात
दुपारनंतर संपादकांना
शिव्याशाप सुरू होतात

मी म्हणते यांना, 'काय तो
लायसेन्स तरी काढून घ्या
नाहींतर मेली पोस्टकचेरीच
घरामध्यें उघडून टाका !'

कागदांच्या त्या चिठ्ठ्यांवरील
यांचा अफाट गिजबिजाट
मला मुळींच कळत नाहीं
म्हणून करतात कलकलाट !

तुकारामाच्या बायकोशीं हे
नेहमीं माझी तुलना करतात
सॉक्रेटीसच्या बायकोबरोबर
रोज माझा उद्धार करतात !

कोण्या काळीं, एके वेळीं
कुण्या मेल्या संपादकानं
कविता छापली, तेव्हांपासून
यांचं धड नाहीं लक्षण !

पुढच्याच महिन्यांत घडली अद्दल
मासिक त्याचं बंदच पडलं
यांचं मात्र शुक्लकाष्ठ
सतत माझ्या मागं लागलं !

खरंच सांगते, यांच्या कविता
मलादेखील वाचवत नाहींत
सांगून आतां उपयोग काय ?
यांना मुळींच पटत नाहीं

तुम्ही तरी उपाय सुचवा
मला बाई वाटते लाज !
आमचे मिस्टर कविता करतात
त्यांना मुळींच नाहीं लाज !

## आमचे मिस्टर दाढी करतात

रोज सकाळीं आमचे मिस्टर
दाढी करण्यासाठीं बसतात
घर-दार, पोरें-बाळें
स्वतःभोंवतीं नाचवीत असतात

दाढी करतां करतां यांना
गरमागरम चहा लागतो
उकळलेलें पाणी लागतें
ताजा ताजा पेपर लागतो

माझ्या शिवणामधली कात्री
यांना हटकून हवी असते
मिशी रेखून कोरण्यासाठीं
माझी ' आयब्रो पेन्सिल ' लागते

चोवीस तासांत यांची दाढी
रानगवतासारखी वाढते
नुकत्या कापल्या शेतामधल्या
धाटांसारखी राठ असते!

गालावर केसन् केस
निवडून साफ करीत असतात
केसागणीक रक्त फुटते
त्यावर तुरटी चोळीत बसतात

दाढी मऊ करण्यासाठीं
यांचे प्रयत्न चालू असतात
रोज नवीन शेव्हिंग क्रीम
प्रयोग करण्यासाठीं आणतात

' तेल लावून केली म्हणजे
दाढी अगदीं झटकन् होते '
असें ऐकल्यापासून रोज
अर्धा शेर तेल खपतें !

दाढीपूर्वीं एकेक तास
तोंड तेलकट करून बसतात
' हलक्या हातें गाल चोळ '
म्हणून हट्ट धरून बसतात

तशा स्थितींत गाल चोळणें
माझ्या जीवावरतीं येतें
हात रक्तबंबाळ होणार
याची मला खात्री असते

यांची दाढी करून करून
सलूनवाले फसले आहेत
' क्रेप ' कंपनीचे जर्मन वस्तरे
बाद करून बसले आहेत !

गांवचे सगळे सलूनवाले
नेहमीं यांना नकार देतात
रस्त्यावरचे धोकटीवाले
यांना पहातांच पळ काढतात !

घरांतदेखील निम्म्यावरच
नवीन ब्लेड मोडून जातें
दुकानांतून नवें ब्लेड
यांना आणून द्यावें लागतें

कित्तीतरी लहानमोठ्ठे
आरसे यांनीं आणले आहेत
तोंडें वेडीवांकडीं करून
रोज त्यांत पहात आहेत

गल्लीमधलीं सगळीं मुलें
अशा वेळीं गोळा होतात
यांच्याभोंवतीं कडें करून
यांना निरखून पहात बसतात

आमचा बाळू मात्र तेव्हां
कागदपेन्सिल घेऊन बसतो
यांचे बदलणारे चेहरे
पाहून पाहून चित्रें काढतो

त्याचीं असलीं सगळीं चित्रें
अगदीं पहाण्यासारखीं आहेत
कोल्हा, माकड, बैल म्हणून
मुलें घेऊन गेलीं आहेत !

तोंडावरतीं क्रीम लावून
तीन तीन इंच फेस काढतात
तेव्हां मात्र साऱ्या खोल्या
सुवासानें भरून जातात

मात्र तेव्हां छोटी बेबी
माझ्या पदराखालीं लपते
" आला आला बागुलबोवा ! "
म्हणून सारखी रडूं लागते

रोज यांच्या मिशीमध्यें
नवीन नवीन फॅशन बनते
कधीं लांब, कधीं आंखूड
कधीं सफा-चाट होते

दाढी करून संपतां संपतां
मिशा कोरून काढीत बसतात
त्यांतच इतका वेळ जातो
पुन्हां केस उगवूं लागतात !

दाढी केल्याखेरीज कध्धीं
ऑफिसमध्यें जात नाहींत
त्यांच्या ' लेडी बॉसला ' म्हणे
' शॅबी ' लोक आवडत नाहींत

म्हणून रोज एकेक तास
घोटून दाढी करण्यांत जातो
सायंकाळीं पहावें तों
चेहरा पूर्वींसारखाच होतो !

म्हणून रोज " सायंकाळीं—
दाढी करा " म्हणतें आहे
आमचं मेलं ऐकतो कोण ?
मी थोडीच ' बॉस ' आहें ?

## जळ्ळं मेलं यांचं प्लॅनिंग!

जळ्ळं मेलं यांचं प्लॅनिंग,
लाजा कशा वाटत नाहींत!
आम्हा म्हाताऱ्यांचं मेलं
कुणीसुद्धां ऐकत नाहीं

पांच वर्षांत कशाबशा
हिला तीन पोरी झाल्या
तेवढ्यांत आमच्या सूनबाई
अगदीं मेटाकुटीस आल्या

तरी बरं आमच्या वेळीं
असलीं कांहीं थेरं नव्हतीं
प्रत्येकीला कमींत कमी
दहाबारा पोरं होतीं

मिळकत आणि पोरं यांचा
हिशेब घालीत बसलों नाहीं
देव देतो त्याला आम्ही
कधींच नाहीं म्हटलं नाहीं

टानिकं आणि व्हिटामिनं
आम्ही कधीं घेतलीं नाहींत
डॉक्टरांचीं तोंडं कधीं
जन्मांत देखील पाहिलीं नाहींत

तरी देखील मी म्हणत्यें
आमचं वाईट झालं का ?
संसार कसा छान झाला
कमी कांहीं पडलं का ?

घर – भर मुलं – बाळं
असलीं म्हणजे बरं वाटतं
यांचं घर बघा तरी
कसं ओकं ओकं वाटतं

हिचा नवरा माझा ' राजा '
पांच पोरींनंतर झाला
सांगून हिला पटत नाहीं
उलट वेड्यांत काढते मला

सोनी, मनी, शकी आणिक्
कमल, विमल, प्रत्येक वेळीं
मुलगा झाला नाहीं तरी
आम्हीं आशा नाहीं सोडली

सहाव्या वेळीं ' राजा ' झाला
तोही पायगुणाचा ठरला
रघ्या – शिवा – गोविंदांचा
त्याच्या मागून जन्म झाला

हेच आमच्या सूनबाईला
सारखं ओरडून सांगतें आहे
पांच मुलींनंतर मुलगा
आमच्या घरची संवयच आहे

राजा माझा भोळा सांब
त्याचा नकार मुळींच नाहीं
सूनबाईच द्वाड आहे
कोणाचंच ऐकत नाहीं

तिला सहावा मुलगाच होईल
याची मला खात्री आहे
पण मेली ऐकत नाहीं
तीनवरच थांबली आहे !

आतां मात्र सांगून सांगून
मीच हात टेकले आहेत
हिच्याच कडून उलट-सुलट
बोलणीं ऐकून घेतलीं आहेत

तेव्हां आज मात्र मला
राहून राहून वाटतं आहे
आम्हींच प्लॅनिंग केलं नाहीं
हेंच मुळांत चुकलं आहे !

तीन पोरी होतां क्षणींच
आम्हींच पुरे म्हटलं असतं
तर मेल्या सूनबाईचं
तोंडच पहावं लागलं नसतं ! !

## मधली सुट्टी

मधल्या सुट्टींत लाऊंजमध्यें
एक ‘ नायलॉन ’ वाट पाहते
एक लिप्स्टिक मिस्किलपणें
तिच्याकडे पाहून हंसते

एक ‘ बॉब ’, एक ‘ स्कर्ट ’
आपापसांत खिद्ळत आहेत
‘ जाई काजळ ’ नेल पेंटशीं
खालच्या सुरांत बोलत आहे

टेलिफोनचा नंबर कोणी
हलक्या हातें फिरवीत आहे
लाजत लाजत टेलिफोनच्याच
तोंडास ओठ लावीत आहे !

एक ‘ सहावारी ’ आपल्या
मॅचिंगकडेच पहाते आहे
एक ‘ नऊवारी ’ आपली
निरी साफ करते आहे

एक ‘ वेणी ’ गंभीरपणें
‘ अंबाड्याशीं ’ बोलते आहे
‘ सिल्क साडी ’ ‘ हॅन्डलूम ’कडे
कुतुहलानें पहाते आहे

एक ‘ कॅप्स्टन ’ कोपऱ्यामध्यें
राख झटकीत उभा आहे
अधून मधून ‘ पोटीमा ’ला
जरा निरखून पहातो आहे !

एक ‘ गॉगल ’ रुमालानें
आपला चेहरा पुसतो आहे
गॉगलमधून काय पहायचें
आधींच हेरून ठेवतो आहे

एक ‘ नेकटाय ’ मिशीमध्यें
कळत नकळत हंसतो आहे
एक ‘ टक्कल ’ लंचसाठीं
चांगली जागा शोधतो आहे !

# आज पाहून हंसत नाहींस !

केव्हांतरी दिसशील असं
नेहमीं मला वाटत होतं
न हंसतांच जाशील असं
मात्र कधींच वाटलं नव्हतं

पाहून देखील न पाहिल्याचा
आज आव आणते आहेस
समोर येऊन न हंसतां
मलाच चाट पाडते आहेस !

...कॉलेजांत तुझी माझी
केवढी दाट मैत्री होती !
चार वर्षं बरोबरीनें
आपण तेथें काढलीं होतीं

आपली तसली मैत्री तेव्हां
चर्चाविषय झाली होती
लोक काय म्हणतात याची
आपण पर्वा केली नव्हती

हॉटेलमधली स्पेशल रूम
कित्ती वेळ आडवीत असूं !
न खातांच 'पोट भरलं'
म्हणून परत येत असूं

आठवतं कां एकदां आपण
सिनेमाला गेलों होतों
खूप लेट झाला होता
अंधारांतच शिरलों होतों

विजेरीच्या प्रकाशांत
खुर्च्या शोधून बसलों होतों
स्टोरी मुळींच आठवत नाहीं
पिक्चर थोडंच पहात होतों !

आणि मग एकाएकीं
मध्येंच फिल्म तुटली होती
खुर्च्यांवरची एक स्टोरी
प्रेक्षकांना दिसली होती

इतकं सारं असून देखील
आपली नुसती मैत्रीच होती
आपलं लग्न होणार नाहीं
दोघांचीही खात्री होती

एक दिवस तुझं लग्न–
ठरल्याचं तूं सांगत आलीस
कोण्या एका ठोंब्याचं
सारखं कौतुक करूं लागलीस

मी खूप चिडेन असं
तुला नक्की वाटलं होतं
तसं कांहींच झालं नाहीं
म्हणून दुःख दाटलं होतं

तोच ठोंब्या आज मला
तुझ्या बरोबर दिसतो आहे
काय त्याला सांगते आहेस ?
माझ्याचकडे पहातो आहे

माझ्याकडे ओळखीदाखल
चुकून देखील पहात नाहींस
त्याला मात्र माझ्याबद्दल
कांहींतरी सांगते आहेस

'तो तिकडे दिसतोय् ना
माझ्याच वर्गामध्यें होता
मला मुलींच आवडत नसे
पुढें पुढें करीत होता.'

हें किंवा असंच कांहीं
सांगून मोकळी झाली असशील
पुढें होऊन ओळख देईन
म्हणून घाबरून गेली असशील

तसलं कांहींच करणार नाहीं
माझी बायको सोबत आहे
तिला देखील तुझ्याबद्दल
असंच कांहीं सांगतों आहे !

## तुला पहातां पतीसंगतीं

पतीसंगतीं तुला पहातां,
कसेंसेंच हो मजला
पलिकडल्या वर्षीं मी ' पाहुन '
गेलों होतों तुजला
प्रसंग सगळा त्या वेळींचा
स्पष्ट आज आठवतो
खास निमंत्रण घेउन आम्ही
बघण्या आलों होतों
एकदोन ती मित्रमंडळी
सोबत माझ्या होती
चुकवुन त्यांच्या नजरा दृष्टी
तुला न्याहळित होती
कुणी विचारी " नांव काय ? "
तूं पुटपुटशी तें कांहीं
' गातां येतें काय ? ' यावरी
उत्तर आलें नाहीं
देतांना मज चहा आठवे
थरथर तव हातांची
कानांमध्यें अजून घुमते
किणकिण बशी–कपाची
आणि अचानक कुणी म्हणालें
' उठायचें ना आतां ? "

मीही चटकन् उठून म्हणालों
“ उशीर झाला भलता ! ”

नकळत अडलें पाऊल दारीं
दृष्टी मागें वळली

माजघराच्या दारामागें
किंचित् सळसळ झाली

दुसरे दिवशीं काय जाहलें
नाहीं कळलें मजला

तुमच्याकडचा माणुस येऊन
नकार घेऊन गेला

दोन-तीन मी आणि पाहिल्या
एक पसंतिस येई

आणि अतां तर घरांत माझ्या
खेळतसे नवलाई

× × ×

तुला पहातां पतीसंगतीं
आज कसेसें झालें

तुझेंहि पाऊल मला पाहतां
वाटे क्षणभर अडलें !

## बस–स्टॉप

—बस स्टॉपवरतीं उभा असतों
कधीं कधीं तासन् तास
रांगेमध्यें ताटकळत
बस येण्याची वाट पहात
आणि बहुतेक वेळीं
रांगेमध्यें दोनी बाजूंना
उभे असतात दोन 'ठोंबे'—पु...रु...ष...!
गर्दी करीत, धक्के देत
त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत
मान उंचावून
दूरवर न्याहळीत असतों
बसचा मार्ग
लांबून येणाऱ्या प्रत्येक बसचा
नंबर ओळखण्याचा
प्रयत्न करीत असतों
पण बहुतेक येतात 'रॉंग नंबर'
एखादीच हवी ती येते
आणि हटकून ती भरलेली असते
मग सुरू होतो
बी. ई. एस्. टी. चा उद्धार
मनांतल्या मनांत
चारचौघांत, दोन्ही ठोंब्यांच्या सुरांत सूर मिसळत!
—पण एखादा दिवस मात्र
अगदींच निराळा असतो

जणूं कांहीं तो दिवस
माझा हेवा करीत येतो
बस–स्टॉपवरच्या रांगेंत असते
त्या दिवशीं
डाव्या बाजूला माझ्या शेजारीं
' नायलॉनची साडी '
काळजीपूर्वक पदर ढवळणारी
कपाळावर कुंकवाऐवजीं
लिप्स्टिक रेखलेली
नखांपासून पर्सपर्यंत
रंगसंगति साधलेली,
ओठांचा रंग पुसणार नाहीं अशा बेतानें
नाजुक रुमालानें तोंड पुसणारी,
न लागलेल्या धक्क्याबद्दल
' सॉरी हं ' म्हणत हंसणारी
जीव घेणारी
चेहऱ्यावरतीं त्रयस्थाचा भाव ठेवणारी
स्वतःकडे ' काय ' आहे
याची कणाकणांत जाणीव असणारी
...आणि अशा दिवशीं मात्र
बस माझा सूड घेते
हवा तो नंबर नको असूनही
दोन मिनिटांत येतो
आणि एक अनुभव
इतिहासजमा होतो !

## आठ लाखांपैकीं एक

आठ लाखांमधलं एक
आमचं खेडेगांव आहे
शोधून देखील मिळणार नाहीं
असंच त्याचं नांव आहे

इथें आहे पंचायत
शाळा आहे, असलीच पाहिजे !
सोसायटीचें ऑफीस आहे
राजकारण केलेंच पाहिजे !

एस्. टी. साठीं ' इस्क्यांड ' आहे
प्यासिंजरची लाईन लागते,
बुधवारच्या बाजाराला
तोबा तोबा गर्दी असते !

नदी आहे, घाट आहे
पार आहे, चावडी आहे
मारुतीचें देऊळ आहे
तशीच एक मशीद आहे,

' च्या 'साठीं ' हाटील ' आहे
' दांडी मारून ' चहा मिळतो,
" पांढरी टोपी–एक गिल्ली ! "
पोऱ्या ओरडून सांगत असतो

साखरेसाठीं इथेंदेखील
लांबच लांब रांग लागते
अधून मधून पोलीस दिसतो
हातभट्टी चालूच असते

इथें ' चौदा कॅरट ' नाहीं
शंभरनंबरी सोनें मिळतें
मोरारजीचा धाक नाहीं
सोनारांची चलती असते

वर्षाकांठीं एक वेळ
शिणीमाचा तंबू येतो
रोज दोन ' खेळ ' दाखवीत
तीन महिने मुक्काम करतो

संगीताची बारी असते
तमाशाचा फड येतो
सोंगाड्याचें भजन असतें
अधून मधून ' जलसा ' होतो

पंचायतीच्या निवडणुका
तीन वर्षांनंतर होतात
सत्तेसाठीं खेचाखेची
मारामाऱ्या ! डोकीं फुटतात

चावडीवरचा रेडीयो
सरपंचाच्या घरांत गातो
बॅटरी संपली म्हणजे हटकून
चावडीमध्यें ठेवला जातो

इथें आहेत गल्ली-बोळ
रस्ते आहेत, वाड्या आहेत
आजकाल घरांनाही
नवे नंबर दिले आहेत

पण पत्ता शोधण्यासाठीं
हिंडत राह्यचें कारण नाहीं
कुणाला कोणी माहीत नाहीं
असें येथें होतच नाहीं

बारीक सारीक गोष्टींचाही
प्रत्येकाला पत्ता असतो
प्रत्येकजण दुसऱ्याबद्दल
चवी-चवीनें बोलत असतो

आठ लाखांपैकी एक
आमचें खेडेगांव आहे
आतां त्याच्या गमतीजमती
अधून मधून सांगणार आहे !

## पुणेरी कौतुक

देशविदेशीं जा कोठेंही
तिथें ‘ पुणेरी ’ भेटेल
चुकवुन तुम्ही जाल, परी तो
खास तुम्हांला हटकेल !

शहर पुण्याचें कौतुक त्याच्या
तोंडामध्यें सदा वसे
सारें ऐकून घेण्याआधीं
टाळून त्याला जाल कसे ?

कौतुक त्याचें चालू असतां
मध्येंच त्याला अडवूं नका
पटलें नाहीं जरी तुम्हांला
तरीही शंका घेऊं नका !

‘ पट्ठे बापू ’ गाउन गेला
कीर्त पुण्याची कवनांत
आज पुण्याचें कौतुक ऐका
‘ पुणेकरा ’ च्या शब्दांत—

कशास प्रौढी हिमालयाची
थंडी तेथें अती असे
हिमालयाहुन हवेशीर ही
पर्वति येथें उभी असे

मुळा-मुठेला म्हणोत कोणी
‘ गटार ’, ‘ नाला ’ चेष्टेनें
‘ गंगा ’,‘ यमुना ’,‘ सरस्वती ’ला
देखिल त्यांची सरी नसे !

‘ संभाजी उद्यान ’ पाहुनी
निवतिल डोळे तुमचेही
‘ पार्क पेशवे ’ पहात असतां
स्वतःस विसरुन जाल तुम्ही !

‘ शालिमार ’ उद्यान तयाला
‘ संभाजी ’ची शान नसे
‘ वृन्दावन ’ उद्यान पाहतां
‘ पेशवे ’पुढें थिटें असे

कशास शेखी पुल होऱ्याची
‘ लकडी ’पुलाचा त्यास न डौल
‘ नव्या पुला ’च्या पुढें पाहतां
‘ सोन-पूल ’ तर कवडीमोल

नकाच सांगू मिजास आम्हां
अग्न्याच्या त्या किल्ल्याची
दिपतिल डोळे दिंडी पाहुन
शनिवाराच्या वाड्याची

‘ सदाशिवा ’ च्या नांवें वसली
‘ पेठ ’ दिगंतीं विख्यात
बुद्धीचा जो अर्क तयाचा
‘ नाना–वाडा ’ प्रख्यात !

बूट, चप्पल्या, तशा सपाता
सॅन्डल्स किंवा चढाव ते
लाल ' पुणेरी जोड्या ' पुढतीं
काय तयांची क्षिती असे !

पाणि आणण्या जाणाऱ्या त्या
नारीची तर पोज पहा
जगांत कोठें दिसेल का हो
असलें दुसरें शिल्प महा !

अशा आमच्या पुण्यास तुम्ही
एकदां तरी येऊन जा
पुणें-दर्शनासाठीं मजला
सोबत तुमच्या घेउन जा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................. दि: ..................
.................. नों: दि: ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 78682

## अरे भाई, लाईन लगाव

जेथें जातों तेथें म्हणतात
अरे भाई, लाईन लगाव !
तिकिटांच्या खिडकीपाशीं
लांबच लांब रांग असते

तिकिट काढून झाल्यावरही
लाऊंजमध्यें रांग असते
पहिला शो सुटण्यासाठीं
रांगेंत वाट पहावी लागते

आंत शिरत असतांनाही
रांग धरून जावें लागतें
इंटरव्हल व्हायच्या आधींच
पळत बाहेर यावें लागतें

जेथें जातो तेथें तेथें
रांग कांहीं सुटत नाहीं
रांग मला, मी रांगेला
सहसा कांहीं सोडीत नाहीं

परवांच एक माझा मित्र
नको तेथें प्रथम गेला
लाईनमध्यें बराच वेळ
उभा राहून परत आला

तेथें देखील रांग असेल
त्याला स्वप्नांत वाटलें नव्हतें
तेव्हांपासून त्याला म्हणे
स्वप्नांत देखील रांगच दिसते

एके काळीं रांगेमध्यें
फारशी कांहीं मजा नव्हती
पुरुष आणि स्त्रियांसाठीं
तेव्हां स्वतंत्र रांग होती

आज काल रांगेमध्यें
समान संधी आली आहे
प्रत्येकाला जशी हवी—
तशी संधी मिळते आहे

अशा रांगेंत उभ्याउभ्या
काय होईल सांगवत नाहीं
हृदय आणिक पैसा-पाकीट
उघडं ठेवून भागत नाहीं

अशा रांगेंत अनेकांचे
अनेक फायदे देखील होतात
घरच्या कर्म-कटकटींना
लोक पूर्ण विसरून जातात

माझ्या एका मित्राची
रांगेमध्येंच ‘ लाईन लागली ’
दुसऱ्या एका मित्राची
‘ लाईन ’साठीं रांग चुकली

कोणी एक वकील म्हणे
रांगेमध्येंच कन्सल्ट करतो
अशीलाच्या गांठीभेटी
नेहमीं रांगेमध्यें घेतो

तसाच एक डॉक्टर देखील
रांगेमध्येंच पेशंट शोधतो
घरचा पत्ता लिहून देऊन
'नंतर येऊन भेटा' म्हणतो

कोण्या एका विद्यार्थ्यानें
रांगेमध्येंच अभ्यास केला
जातां जातां, उभ्याउभ्या
त्याला क्लास मिळून गेला

एकदां एका लिप्स्टिकची
रांगेमध्यें ओळख झाली
दुसऱ्या क्षणीं त्या दोघांनीं
रांग सोडून टॅक्सी केली

एकदां एका बॉसला
आपली 'टायपिस्ट' रांगेंत दिसली
लगेच आपली गाडी थांबवून
त्यानें तिला आंत घेतली

कोण्या एका केन्डीडेटला
रांगेमध्येंच नोकरी लागली
कोण्या एका नायलॉनची
रांगेमध्येंच बढती झाली

रोज मनांत आशा धरून
मीही रांग पकडीत असतों
पण यांतला एकही अनुभव
माझ्या नशिबामध्यें नसतो !

पण म्हणून अजून कांहीं
पूर्ण निराश झालों नाहीं
केव्हां तरी संधी मिळेल
अजून वेळ गेली नाहीं !

## एक तरी घ्या ठेउन कविता

काय म्हणाला ? नांव काय ? छेः !
उगाच थट्टा करतां माझी
काय एकही नाहिं वाचली
माझी तुम्ही कविता ताजी ?

काय राव हो, वाचत नाहीं
रोज नांवचें टपाल तुमच्या ?
पोस्टानें मी नित्य धाडतों
तुमच्या नांवें कविता माझ्या !

खूण अतां तरि पटली कां हो ?
आठवतें का सही फाकडी ?
नसेल तर मी ठेउन जातों
कवितांची ही इथें चोपडी !

करून देतों ओळख माझी
इलाज नाहीं दुसरा आतां
ऐकल्यावरी म्हणाल तुम्ही,
" सरला असुचा संभ्रम पुरता ! "

झाली नव्हती पूर्णहि जेव्हां
पहिली माझी लिहून कविता
रांग सोडुनी नवोदितांची
होतों शोधित पुढचा रस्ता !

आणिक नाहीं स्वीकारली जरि
कुणीहि माझी दुसरी कविता
मागें टाकुन प्रथितयशांना
प्रवास माझा चालू होता...

जरी अजूनी एकहि माझी
प्रसिद्ध कविता झाली नाहीं
सिद्धहस्त मी कवी समजतों
मला जगाची पर्वा नाहीं...

भाषाभूषण—युगप्रवर्तक
ठाउक आहे माझें मजला
भागच आहे अतां कोरणें
सुवर्णाक्षरें इतिहासाला

जेव्हां तुमच्या मासिकामधें
प्रसिद्ध होतिल माझ्या कविता
झडेल नौबत नव्या युगाची
मान तुम्हांला जातां जातां !

विचार याचा करून सांगा
एक तरी घ्या कविता ठेउन्
'नको ?' तर बरें ! येतों आतां
घ्या सारें तें जातों घेउन्

एकच जातां जातां सांगा
'अमकें' मासिक कोठें आहे ?
पत्ता मजला निश्चित सांगा
तिथेंच आतां जातों आहे !

## मला एक कविता झाली

काल रात्रीं झोपलों तेव्हां
शंका देखील नाहीं आली
आज सकाळीं पाहतों तों
मला एक कविता झाली

कालपर्यंत जन्मभर
कवींची मी थट्टा केली
त्या माझ्या पापाची
आज अशी अद्दल घडली

कधीं कवडे कधीं कपी
म्हणून त्यांना चिडवलं
आणि आतां माझ्या मागें
कवितेचं शेपूट लागलं

आतां ते कवडे मला
कळपांत तरी घेतील कां ?
'कावळा' म्हणून टोचून टोचून
रक्तबंबाळ करतील ना !

जन्मांत कधीं कवी बनेन
असं मला वाटलं नव्हतं
कवी म्हणजे माणूस असतो
हेंच मला पटलं नव्हतं

आज चांगली अद्‌ल घडली
मलाच एक कविता झाली
कवितेच्या प्रांतामध्यें
एक नवी लागण झाली

एकाएकीं हलकें फुलकें
मला वाटूं लागलें आहे
आज मला चांदणंच
सगळीकडे दिसतं आहे

आज या जगापुढें
स्वर्ग तुच्छ वाटतो आहे
माझं जीवन म्हणजे जणुं
एक स्वप्न वाटतं आहे

कालपर्यंत जिच्याकडे
ढुंकून कधीं पाहिलें नव्हतें
आज तीच प्रत्येक बाई
राधा किंवा रंभा वाटते

ओठा–ओठावरतीं आज
लाल डाळिंब फुटलें आहे
गाला-गालावरतीं आज
गुलाब गेंद उठला आहे

डोक्यावरच्या केसांमध्यें
काळेभोर साप दिसतात
डोळ्या-डोळ्यांतून आज
मदनशर विद्ध करतात

नाकामध्यें चाफेकळी
दांतामध्यें कुंदकळी
अशी प्रत्येक सुंदर स्त्री
माझा घेते आहे बळी

चालीमध्यें हत्ती दिसतो
कटीमध्यें सिंह लपतो
कर्दळीच्या सोटांनाही
आज नवा अर्थ येतो

यौवनाच्या प्रांतामध्यें
कनक-कुंभ दिसूं लागतात
ससे आणि कबुतरें
आपलाही क्लेम सांगतात

या साऱ्यांच्या भाऊगर्दींत
बाई कुठेंच दिसत नाहीं
तरी देखील त्यांच्यामधून
आतां माझी सुटका नाहीं

हें सारें होतें आहे
माझा त्याला इलाज नाहीं
कसें होतें, काय होतें
हेंही सांगतां येत नाहीं

पण हें कां झालें
याचं कारण शोधलं आहे
त्या पापाचें फळ मी
आज असं भोगतों आहे

कवितेचीं पानं टाळून
मासिकें मी वाचत असे
त्याचेंच हें प्रायश्चित्त
आज असं मिळतं आहे

म्हणून सांगतों, हें पाप
तुम्ही तरी करूं नका
मासिकांचीं पानं कधीं
कविता टाळून वाचूं नका

आणि आतां काव्य-प्रांतांत
माझं भूत उभं आहे
जपून रहा पातक्यांनो
मीच शासन करणार आहें !

## माझें दैवच खोटें आहे

मी एक कवी आहें
बहुप्रसव कवी आहें

शारदेनें माझ्या हातीं
कवितेच्या पाळण्याची
सतत दोरी दिली आहे
मी एक कवी आहें
बहुप्रसव कवी आहें

लुळीं, पांगळीं, अपंग, थोटीं
अशक्त, रोगीं, काळीं-बेरीं,
कुढीं, खुजीं आणि लंगडीं
अशीं कितीक काव्य-बाळें
सतत मी प्रसवत आहें
मी एक कवी आहें
बहुप्रसव कवी आहें

त्या ओकाऱ्या, ती तळमळ
ती घालमेल, ती जळजळ
त्या वेदना, ते उसासे
जीवघेणी ती धडपड
ते डोहाळे, ते सोहाळे
सारें कांहीं प्रत्येक वेळीं
मी सहन केलें आहे
मी एक कवी आहें
बहुप्रसव कवी आहें

विश्वास ठेवा, ठेवूं नका
हंसा किंवा हंसूं नका
पण निदान कानांवरतीं
हात तरी घेऊं नका
एकाच वेळीं जुळीं, तिळीं,
अशीं कित्येक झालीं आहेत
एका रात्रीं तर प्रसूति-विक्रम
आठावरही गेला आहे
महिन्याकांठीं अगणित वेळां
या यातना भोगल्या आहेत
मी एक कवी आहें
        बहु प्रसव कवी आहें

शारदे, सरस्वती
माझ्यावर कृपा कर
परत घे आपला वर
निसर्गाला जरा आवर
याला मी विटलों आहे
मला हें नको आहे
हें सारें आतां माझ्या
शक्तीबाहेर चाललें आहे
मी एक कवी आहे
        गांजलेला कवी आहे

स्त्रियादेखील माझ्याहून
कितीतरी सुखी आहेत
वर्षाकांठीं एकच वेळ
त्यांना ही भीति आहे

कुमारिका अन् विधवांना
त्यांतूनही मुक्ती आहे
मला मात्र सवड नाहीं
अंतर नाहीं, वेळ नाहीं
प्रतिभेचा सूक्ष्म जंतु
कल्पनेच्या बीजाशीं
कधीं, केव्हां, कुठें, कसा,
जाऊन भिडेल, कळत नाहीं
आणि माझ्या नशीबींची
प्रसववेदना चुकत नाहीं
असा मी कवी आहें
            बहुप्रसव कवी आहें

मानवतेच्या उपासकांनो
स्त्रीजातीच्या उद्धारकांनो
धन्य तुमच्या शास्त्राची
धन्य तुमच्या उपायांची
निसर्गाच्या गुलामींतून
स्त्रीची तुम्ही मुक्ती केलीत
पण तुमचे सारे शोध
सारें तंत्र, सारे मंत्र
माझ्यापुढें थिटे आहेत
माझें दैवच खोटें आहे
मी एक कवी आहें
            बहुप्रसव कवी आहें

आतां मात्र हरलों आहें
थकलों आहे, दमलों आहें

दया करा, कृपा करा
माघारीं धाडूं नका
उपाय सांगा, उपाय सांगा
दारीं याचक आला आहे
'नाहीं' म्हणतां ? बरें जातों !
मात्र एक लक्षांत ठेवा
नुकतेंच झालेलें हें अपत्य
इथेंच ठेवून जातों आहें
पोरकें पोर असलें तरी
जपून त्याला सांभाळाल
हीच अशा मनांत धरून
माघारीं जातों आहें
मी एक कवी आहें
बहुप्रसव कवी आहें!

## अहो, मला कवी म्हणा

कवी म्हणा, कवी म्हणा
        अहो, मला कवी म्हणा

बडबड गीतें, गडबड गीतें
तडफड, तळमळ, जळजळ गीतें
नीति गीतें, प्रीति गीतें
प्रौढ गीतें, बाल गीतें
अशीं आणखीं किती गीतें
मीं लिहून ठेवलीं आहेत
कवी म्हणा, कवी म्हणा
        अहो, मला कवी म्हणा

संगीतिका, किंचीतिका
चावटिका, वात्रटिका
चिंतनिका, काळजिका
निरोपिका, स्वागतिका
अशा किती गीतिकांचीं
शतकें मीं गांठलीं आहेत
अहो, मला कवी म्हणा
        कवी म्हणा, कवी म्हणा

छंद काव्यें, बंद काव्यें
मुक्त काव्यें, गद्य काव्यें
खंड काव्यें, बंड काव्यें
दंत काव्यें, ओष्ठ काव्यें
मंद काव्यें, शीघ्र काव्यें

यंत्र काव्यें, मंत्र काव्यें
साकी, ओवी, वृत्त काव्यें
अशी कितीं तरी काव्यें
आजवर मीं लिहिलीं आहेत
आतां तरी कवी म्हणा
कवी म्हणा, कवी म्हणा

संसार गीतें, संस्कार गीतें
तशींच स्नानगृह गीतें
जन्म गीतें, मृत्यु गीतें
हास्य गीतें, शोक गीतें
विमान, मोटर, आगगाडी
सायकल, खटारा, बैलगाडी
या साऱ्यांच्या तालावरचीं
माझ्याकडे आहेत गीतें
सारीं मोठीं सुंदर आहेत
एकदां तरी वाचून पहा
नाहीं तर असेंच करा
मी म्हणतों, तुम्ही ऐका
माझें ऐका हो ऐका
कवी म्हणा, कवी म्हणा
अहो, मला कवी म्हणा

किती पुस्तिका, किती चोपडीं
मीं छापवून घेतल्या आहेत
कधीं विकत, कधीं फुकट
वेळीं चहाच्या कपासकट

कधीं भेट, कधीं बक्षीस
म्हणून सारीं वाटलीं आहेत
किती सभा, किती मैफली
माझ्या घरीं झाल्या आहेत
प्रत्येक वेळीं रेकून रेकून
माझ्या कविता म्हटल्या आहेत
कवी म्हणा, कवी म्हणा
        अहो, मला कवी म्हणा

कवी माझ्यांत रुजला आहे
मुरला आहे, पिकला आहे
रडवा चेहरा, भकास मुद्रा
बायकी केस, गबाळा वेष
सारें हवें तसें आहे
आतां तरी कवी म्हणा
अहो, मला कवी म्हणा
        कवी म्हणा, कवी म्हणा !

## संमेलनाची वर्दी

संमेलनाची वर्दी आहे
मनांत माझ्या गर्दी आहे
कोरा बंद तयार आहे
प्लेटो पेन कॅमल पिऊन
अधीर होऊन स्रवतें आहे

मनासारखी जागा आहे
उदबत्ती ही जळते आहे
फुलदाणींतला मोहक गुलाब
मनाला आळवीत आहे
सुपारीचें खांड आणि
अडकित्ताही तयार आहे

पण इतकें सारें असून
कांहीं तरी अडलें आहे
कुठें, कसें कुणास ठाऊक
काव्य माझें दडलें आहे

मन कांहीं हलत नाहीं
खळबळ नाहीं, खळखळ नाहीं
विकाराच्या वळवळीला
पंख कांहीं फुटत नाहीं
आणि माझ्या हातांतून
कविता कांहीं उतरत नाहीं

संमेलनाची वर्दी असून
मनांत माझ्या गर्दी असून
पेन, कागद, वातावरण
सारें कांहीं सज्ज असून
मन कांहीं हलत नाहीं

नवीन कविता स्फुरत नाहीं
कविता कांहीं होत नाहीं
पण ' नवी कविता नाहीं '
असें सांगून भागणार नाहीं

शेवटीं आतां असेंच करीन
सुचलें आहे हेंच आतां
कागदावर लिहून काढीन
हीच एक कविता म्हणून
संमेलनांत वाचून दाखवीन !

## प्रेमपत्र

प्रिय सखयाला प्राणसखीनें
पत्र धाडलें बत्तिस पानें
( अडिच आण्यांचे एक्सर–साइज)
कमलदलावर जणूं ओतिलें
हृदय आपुलें शकुंतलेनें !

घोटिव कागद, गाळिव शाई
बोरूची ती जाड लेखणी
गोल ठळकशा अक्षरांतुनी
व्यथित मनाचें दर्शन होई !

अन् वाळावे शब्द म्हणूनी
ओति तयांवर ती वाळूकण
चमक तयांची जणूं दाखवी
प्रेमाग्नीची दीप्ती त्यांतुन !

प्राणसख्याला पत्र मिळावें
(नॉटपेडसाठीं पैसे मोजून ! )
क्षणांत उघडून जरा चाळलें
वाचायातें धीर निघेना
आवेगानें म्हणुनि चुंबिलें

बरबटली शाई ओठांवर
वाळूकणांचीं दांतीं करकर !

## कारण

कवयित्री ती होती उत्तम
परंतु बांधा तिचा लघुत्तम
शोधण्या तिची कुठें नासिका
कोलंबसही पडे फिका

नयनीं एका पुष्प विकसलें
हिरकणी दुसरी शोधी कोपरे
केसांच्या पाहुनि स्पर्धेला
शुभ्र बर्फही मनीं वितळला

रजनीच्या साम्राज्याखालीं
मुखीं देवींनीं वसती केली
ओठावरच्या त्या दातानें
ऐरणीवरिल लाजे सोनें

परंतु कविता तिच्या वाचुनी
देहभानही जाय हरपुनी
प्रसिद्ध होती कवयित्री ती
नाहीं तिच्या काव्यांना गणती

दीपावलिच्या अंकाकरितां
कुणी मागवी तिची कविता
आणि विनंती " कृपा करोनी
फोटोही द्या सवें धाडुनि "

अपटुडेट पोषाखें सजुनी
स्टुडियोमध्यें जाय धाउनी
फोटो काढुन तिनें धाडला
मनीं वाटलें, विक्रम केला !

अपेक्षीत तो अंक मिळाला
आतुरतेनें झणीं उघडला
परंतु पाहुन नुसती कविता
खिन्न होय ती मानी वनिता

पोस्टानें मग फोटो आला
पत्र सोबती, म्हणे, " आपुला
फोटो आम्ही नाहीं छापला
कारण असुचा ब्लॉक बिघडला ! "

## एक इसम बारा आणे !

मी आहें परीक्षक
एस्. एस्. सी. चा परीक्षक

खरं म्हणजे शाळेमधला
एक साधा शिक्षक आहे
पंधरा दिवस परीक्षक
म्हणून वेगळा वाटतो आहें

विद्यार्थी नि पालक मला
कठोर कर्दनकाळ म्हणतात
निर्दय आणि हृदयहीन
विशेषणें बहाल करतात

खरं सांगतों, मलादेखील
हृदय आहे, मन आहें
मित्र माझे खात्री देतील
' साधासीधा माणूस आहे '

गेलीं कांहीं वर्षं मला
एस्. एस्. सी. चे पेपर येतात
कधीं नव्हे ते नोकरीखेरीज
चार पैसे जास्ती मिळतात

अनामिकांचे अनेक पेपर
माझ्यापुढें येत असतात

कैद्यासारखे नंबर घेऊन
बापुडवाणे उभे राहतात

पण माझ्या लेखीं त्यांची
किंमत ठरून गेली आहे
एक इसम बारा आणे
हाच त्यांचा भाव आहें

× × ×

पंधरा दिवस दुसरें तिसरें
मला कांहींच सुचत नाहीं
आठ तास रोज काम
करून देखील भागत नाहीं

एका दिवसांत वीसजण
माझ्या हातीं लाल होतात
आणि जमेच्या बाजूला
पंधरा रुपये दिसूं लागतात

पंधरा दिवस खोलीमध्यें
स्वतःला मी कोंडून घेतों
रात्रंदिवस डोक्यामध्यें
पेपरांचाच विचार असतो

माझी खोली त्या दिवसांत
अगदीं पाहण्याजोगी असते
पेपरांचे गठ्ठे असतात
पसरलेलें जेथें तेथें

लाख, सील, मेणबत्ती
सारें कांहीं तयार असतें

ॲस्प्रो, व्हिक्स, ॲनासीन
रोज अनेक वेळां लागतें

बायको आणि पोरें यांना
आंत यायची बंदी असते
पैशांसाठीं पंधरा दिवस
सारें विसरून जावें लागतें

द्दारावरतीं आमची बायको
सारखी पहारा देत असते
"यांच्याकडे पेपर आहेत!"
सारखें कौतुक करीत असते

कारण तिच्या डोळ्यांपुढें
बोर्डाकडचा चेक असतो
रोज एकदां तरी त्याचा
हिशेब मला ऐकू येतो

किती पातळें घ्यायचीं त्याचा
बेत हीच ठरवून टाकते
चेक असतो बाजारांत
घरांत बजेट तयार असतें

हिचा हिशेब चालू असतो
मला मात्र वेळ नसतो
माझ्या डोळ्यांपुढें सतत
मॉडरेटर दिसत असतो

× × ×

एक पेपर माझ्या हातांत
पंधरा मिनिटें टिकत नाहीं

पण त्यांतलें एकही पान
नजरेखालून सुटत नाहीं

कोरें पानही तपासल्याची
खात्री करून द्यावी लागते
त्याच्यावरती तांबडी रेघ—
मारून पावती द्यावी लागते

कोण, काय, कसें लिहितो
विचाराला वेळच नसतो
नमुन्याच्या उत्तरांतील
मुद्दे, डोळा टिपीत असतो

एक बेरीज चुकली तर
पांच रुपये दंड होतो
हाच विचार रात्रंदिवस
माझें मन पोखरीत असतो

आंकडेमोड जन्मामध्यें
मला कधींच जमत नाही
म्हणून मदत घेतल्याखेरीज
काम पुरें होतच नाहीं

कृपा करून हें गुपीत
कुणालाही सांगू नका
निदान बोर्डाकडे तरी
याबाबत लिहूं नका !

× × ×

खरं सांगतो बोर्ड म्हणजे
एक मोठ्ठं मशीन आहे

आणि त्यांतला परीक्षक
बिन्‌डोक्याचा खिळा आहे

या साऱ्याची जाणीव मला
प्रत्येक वेळीं होत असते
तरी सुद्धां चेकची रक्कम
डोळ्यांपुढून हलत नसते

पंधरा दिवस परीक्षक
बनणारा मी शिक्षक आहें
' एक इसम बारा आणे '
ह्याच माझा भाव आहें

मी आहें परीक्षक
एस्. एस्. सी. चा परीक्षक !

REFBK-0014842
REFBK-0014842

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 68623 दि:
क्रमांक 200 नों. दि. 9/8/13/69

## उत्कृष्ट कवितासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | मीठ भाकर | ग. ल. ठोकळ | ३·५० |
| ( २ ) | शिवार | के. नारखेडे | २·०० |
| ( ३ ) | लिंबोळ्या | ग. ह. पाटील | ३·०० |
| ( ४ ) | ग्रामीण नृत्यगीतें | कृष्णदेव मुळगुंद | २·०० |
| ( ५ ) | सजणी | सुधाकर भोसले | ३·०० |
| ( ६ ) | गातात व नाचतात धरतीचीं लेकरें | र. वा. दिवे | २·०० |
| ( ७ ) | विंझणवारा | शां. रा. शिंदे | ३·०० |
| ( ८ ) | लांडगा आला रे आला | मधुसूदन गोखले | ३·०० |

**श्री लेखन वाचन भांडार**

**ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २**